म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१८८

# शिदेष्का

राम सरमळकर

REFBK-0020086
REFBK-0020086

संदर्भ
काव्य २१८६
२००८६
२३।११।७४

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमा.
२००८६ वि. काव्य
२१८६ नों. दि. २३।११।७४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. २००८६
संद. शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २००५८ वि: काव्य
क्रमांक २१५८ नों दि: २३।११

# श्रीलेखा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००५८
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

# श्रीलेखा

-राम सरमळकर

REFBK-0020086
REFBK-0020086

© राम सरमळकर, १९७४

पहिली आवृत्ती :
१८९५
१९७४

मुखपृष्ठ :
राजा मराठे

किंमत :
पाच रुपये

मुद्रक :
स. पां. जोशी
श्री समर्थ प्रेस
ट्रेझरी ऑफिस समोर
ठाणे

प्रकाशक :
राम सरमळकर
वाय ५, फ्लॅट नं. ७८
गव्हर्मेंट ऑफिसर्स क्वार्टर्स
वांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

# प्रस्तावना

मी मुंबईस असताना माझ्या शेजारी एक वेगळे वाटणारे गृहस्थ दिसले; अबोल व गंभीर. पोषाख ठराविक पण कमालीचा व्यवस्थित असून दिखाऊ नसलेला. घरात माणसांची वर्दळ आणि मासे तळण्याचा मोहक वासही लक्षणीय. मला सारखे वाटायचे की, इतके जवळ आम्ही असून भेटगाठ व बातचीत नाही. हे काही बरे नाही. त्याबरोबरच मध्यमवर्गीयांच्या या एकमेकांच्या ओळखी करून घेण्याच्या औपचारिक मर्यादांचेही मला वाईट वाटले. चांगली हाडामासांची जिवंत माणसे ही, काही निमित्त, काम किंवा तिऱ्हाईताने ओळख करून दिल्याखेरीज जवळ येत नाहीत. माझ्याकडे सत्यनारायणाची पूजा होती. शेजाऱ्यांना आमंत्रण गेले तरी हा गृहस्थ काही आला नाही. मला नवल वाटले. कारण आपल्या व्यावहारिक जीवनात उपचारातील परस्पर संपर्काची काही सोंगेढोंगे आहेत. त्यात धर्मविधी व समारंभ यात वरवर प्रतिष्ठा व उपचाराचा काटेकोरपणा दाखवायचा नाही असे एक अभिप्रेत वागणुकीचे गृहीत कृत्य आहे. त्यालाही हे गृहस्थ अपवाद ठरले. म्हणजे एकतर खरेच अपवाद असतील किंवा खूपच ताठर असावेत. योगायोगाने त्यांच्या वैयक्तिक राज्याची अक्षरशः 'इंदिरा' असलेली जी बाई आमच्याकडे आली तिला मी म्हटले, 'सत्यनारायणालाही आले नाहीत म्हणजे आमचा तिटकारा असेल किंवा गध नको—' माझे वाक्य पुरे करू न देता त्या स्पष्ट पण मार्दवी स्वरात म्हणाल्या 'तसे मुळीच नाही, पण तुम्ही ब्राह्मण तेव्हा आम्ही मास–मच्छर खाणारे स्वतःच जपून वागत होतो. उलट त्यांना माणसे व बोलणे आवडते'—या उत्तराने दोन गोष्टी कळल्या, बाई त्यांची बायको होती हे एक आणि दुसरे म्हणजे जबाब बिनतोड देण्यात जशी पटाईत आहे, त्याप्रमाणेच नवऱ्याचे चतुर समर्थन करण्यात सराईत आहे. कारण बाईच्या उत्तरात त्यांच्या मिस्टरांना आम्ही नावडते किंवा नको आहोत याचे उत्तर कौशल्याने टाळलेले होते. परंतु हा संभ्रम फार काळ टिकला नाही. स्वतः यजमानच हजर झाले आणि एक मिनिटात त्यांच्या निःसंकोच वागणुकीचा जो पडताळा मिळाला तो 'एकदा जोडलेला माणूस तोडायचा नसतो' या स्फटिकाप्रमाणे आविष्काराने. हे सर–मळकर !

नंतर आमच्या भेटी होत गेल्या तसे कळत गेले की, हा मनुष्य सोंगाढोंगाचा नसला तरी रंगा–ढंगाचा आहे. रसिक भोक्ता आहे. संयमाचे आणि नियमाचे नसते स्तोम माजवत नसला तरी उपभोगाचे मर्म आणि धर्म हे ओळखतो. खाद्ये रसना चाळवण्याकरता असतात. पेये वृत्ती खुलवण्याकरता चुचकारतात आणि माणसे दुःखाची वजाबाकी आणि आनंदाची बेरीज करण्याकरता एकत्र येतात. तब्येतीचा मनुष्य व मनुष्याची तब्येत यांची वरील भूमिकेमुळे जी सांगड बसते तीतून मेहफिलीची मस्ती फुलते. अशा बैठकी मजकडे झडण्यात श्री. सरमळकरांच्यामुळे भर पडली. अर्थात मजकडे 'अजून' ज्या ज्या

बैठकी होत त्यात मात्र श्री. सरमळकर उपस्थित नसत. सुट्टीच्या दिवशी ते ब्रीज खेळावयास जात. पण मजकडे साहित्यिक 'मिल बैठतात' हे त्यांना ठाऊक होते. असे असूनही त्यांनी येण्यात उत्सुकता दाखविली नाही. मात्र जशी लगट वाढली तशी त्यांची कवनाबरोबरची सलगी कळली. नववधूप्रमाणे आपल्या या 'बसटी'ची त्यांची शर्म पाहून मला जाणवले की, पन्नाशी उलटली तरी यांच्या स्वभावात 'उतार' आला नाही. माझ्याच आग्रहामुळे त्यांचा हा अनावर उद्योग ( काहीच्या मते उपद्व्याप ) कागदावर कसा अवतरला याचा मी शोध घेतला आणि मला कळले की, यात काव्यवृत्तीची अस्सल बीजे आहेत.

श्री. सरमळकर हे तसे साहित्यिक नाहीत. साहित्यिकांच्या कंपूत किंवा गटात वावरणारे किंवा मिरवणारे नाहीत; तेव्हा त्यांनी स्वतःला साहित्यिक म्हणवून घेणे तर दूरच राहिले. सर्वसामान्यासारखे असलेल्या आणि दिसणाऱ्या सरमळकरांना स्वतःचे असे संवेदनक्षम व्यक्तित्व आहे. आर्थिकदृष्ट्या सुमार स्तरात वाढलेल्या सरमळकरांची ही संवेदनाक्षमता व्यावसायिक चढउतार आणि गुंतवणूक यात बेकार झाली नाही. ती त्यांनी कमालीच्या दक्षतेने आणि डोळसपणाने जपली आणि वाढवली. किंबहुना ती त्यांनी नोकरीपेक्षा अधिक अगत्यानं आणि ममत्वानं अंगळली. पण या प्रक्रियेत हळवेपणा व भावनाविवषता ग्रास् दिली नाही. यामुळं भाव अबाधित राहिला आणि रसिकता वर्धमान राहिली. मग भाव आणि रसिकता यांची त्यांना न कळत शद्बाबरोबर दिलजमाई सुरू झाली आणि पाहता पाहता

'अनुभूति कानांत गूंजे
गूढसे काही तरी
निःशब्द रेंगाळे स्वरांची
मालिका ओठावरी,'

मनात असा नाद ओढाळ झाला व त्याने सरमळकरांना आपल्या ताब्यात घ्यावयास सुरवात केली. परिणामतः—

'भावनेला रूप येते
दिव्यतेच्या मंथनी
मोहोरोनी पूर्ण येती
वेदना संवेदना
दावितो क्षितिजे नवी त्या
शब्दे ओंठी नाचता'

सरमळकरांच्या वरवर शुष्क वाटणाऱ्या जीवनात काव्यसंभव झाला. सारस्वताचे दिव्य वारे प्रथम असेच अस्मितेस चाटून गेल्यासारखे भासते. शब्दांचा खेळ सुरू होतो आणि वाटते की, एवढ्या मोठ्या प्रतिभावंताच्या क्षेत्रात आपली यमकांची ही लटपट कुणाला का म्हणून

सांगावी ? हा क्षणभरचा किंवा काही दिवसाचा झटका असणार. परंतु असे नसते. हे झपाटणे आंतून येते आणि भारून टाकते. सरमळकरांचे असेच झाले आणि कवितामागून कविता येत गेल्या. त्यांनी त्या येऊ दिल्या आणि कवनाबरोबरचे सख्य निरपेक्ष राहू दिले. तसेच त्याची वाच्यता फारशी केली नाही. त्यांच्या स्वतःच्या ज्या घरी गृहस्थ धर्मात आतिथ्य व मत्स्याहार यांची सदा दादपुस्त असते तिथे हा घरचा कर्ता गृहस्थ असे काही तरी आस्थेने करतो आहे व तेही सातत्यानं असं कळलं असतं तर त्याची त्यांनी खैर कितपत केली असती याची मला दाट शंका आहे! बाहेरच्या जगात श्री. सरमळकर एक मोठे पोलीस अधिकारी होते तरी घरी मात्र प्रपंच नेटका आणि सरळ करणारे व्यक्ती होते व आहेत. पण या प्रपंचाबरोबरच त्यांनी आणखीन् एक शब्दांचा प्रपंच जो थाटला त्याची कल्पना फारच थोड्यांना आली किंवा त्यांनी दिली. याचा अर्थ त्यांना न्यूनगंड होता असा नव्हे. तसे असते तर त्यांनी केशवसुतांच्या ऐटीत ' दावितो क्षितिजे नवी त्या, ' म्हटले नसते. परंतु साहित्यनिर्मितीबरोबर त्यांना प्रतिभावंताचा ' तो ' अहंकार ग्रासला नाही, त्याचा व्यवसाय करण्याची दुर्बुद्धी झाली नाही; आणि प्रसिद्धीचा हव्यास लागला नाही.

नाहीतर निर्मित शब्द हा मुद्रित शब्द व्हावा म्हणून चांगली चांगली माणसे कोण उपद्व्याप करतात. सरमळकरांना आत्मप्रसिद्धीचा रोग जडला नाही. ' मनुष्य ' बायकोवर, मुलांवर आणि आपल्या पाईपवर जशी बेमतलब मोहब्बत करतो तद्वत सरमळकरांनी काव्य-भक्ती व सृजन केले, आणि ते असेच रसिकांना न कळवत किती दिवस ' नेकी कर और दरियामे डाल ' करत राहिले असते हे कळले नसते—

याच करता मी श्री. सरमळकरांना ' बिघडवण्याचे ' ठरवले. त्यांनी आपला काव्यसंग्रह काढावा असे सुचवले. अशी सूचना करणारा त्यांना प्रथम वेड्यात गणावा असे वाटले असल्यास आश्चर्य नाही. मग मला सांगावे लागले की, प्रसिद्धी किंवा पैशाकरता असे करावयाचे नाही तर एक सारस्वत योग जो जीवनात संपन्न झाला आहे त्याचा आलेख आपुलाच आपल्याशी संवाद करण्याकरता का बद्ध करून ठेवूं नये? अशारीतीने श्री. सरमळकर बिघडले व त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचा संकल्प आम्ही सोडला. हा श्री–लेखाचा संभव !

या काव्य संग्रहातील कविता या संदर्भात वाचली पाहिजे. म्हणजे भाव–भावनांचे उठलेले तरंग व अल्लोळ–कल्लोळ यांची निर्व्याज वीण लक्षात येईल. ' जातीचे नंदी ' यात कवि जे म्हणतो—

' आहे का तुजपाशी
हंबरण्याचा अभाव

बैलाची सोशिकता
पाण्याला वर्ष पुरे
चुकला दिन पोळ्याचा '

ते स्वतःशीच केलेले बोलणे आहे. यावरून विफल मनःस्थितीचा हा माणूस पलायन म्हणून कविता करु लागला असे अनुमान काढणे चुकीचे ठरेल. या अनुषंगाने ' कर्पूर मी ' या कवितेतील खालील ओळी लक्षणीय म्हणाव्या लागतील.

' कर्पूर–वेडा मी
तसंच जगावं आणि
जगता जगता अदृश्य व्हावं
जळून नव्हे–हळुहळु
थंड–मंद गंधाने, आनंदाने धुंदीने ',

सरमळकरांची जाणीव अंकुरते ती बऱ्याच वेळा अंतर्मुख आत्मपरीक्षणातून. या आत्मपरीक्षणास सामाजिक आशय आणि ऐतिहासिक विषयाची कधीकधी प्रकट तर बऱ्याच वेळा अप्रकट पार्श्वभूमी असते. यामुळे त्यांना बोध-प्रबोधनाचा वास येण्याची शक्यता आहे. पण स्वतःचा शोध-बोध घेत लयबद्ध होण्यात या कवितांचा उगम आहे हे लक्षांत घेतल्यास त्याची खुमारी अधिक चांगली कळेल, यामुळेच अर्थाशी संवाद साधून एक आगळे काव्य आपण वाचत असल्याचा प्रत्यय वाचकाला आल्यावाचून राहणार नाही.

—दा. गो. देशपांडे

# वेदना

अनुभूति कानांत गुंजे
गूढसें कांहीतरी
निःशब्द रेंगाळे स्वरांची
मालिका ओठावरी
खोलशा डोहांत नेते
ओढ कातरत्या रवे
अमृताचे थेंब न्हाऊ
घालिती माझ्या मना
चैतन्य हो जागें पुन्हां
नवजीवनाचीं पाउलें
अज्ञातशा प्रांतांत नेती
पंख लावोनी नवे
भारलेल्या जीवनाची
साद कानी ये नवी
जाग येतां अस्मिता मग
लागते उमलावया
विहरते छाया नभांती
सोडुनि पृथ्वीतला
धांवती स्वप्नें सुखाची
द्यावया आलिंगना
गीत–वेड्या मानसाचें
स्वप्न ये साकारुनि
भावनेला रूप येतें
दिव्यतेच्या मंथनीं
मोहरोनी पूर्ण येती
वेदना संवेदना
दावितों क्षितिजें नवी त्यां
शब्द ओंठीं नाचता
अक्षरांचा पाळणा
वात्सल्य विणितां मानसी
रूप साकारोनि येई
काव्य जन्माला नवें

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. 
अनुक्रम 20066 दि. 
20066 नों. दि. 23/97
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 20066
संद. शाखा (स्थळ प्रत)

## शून्य

निळ्या पडद्यावरील
स्वप्निल पतंगांचे अस्थिपंजर
मायावी लक्तरें
अधांतरीं फडफडवीत
अडकतात—
मनाच्या सांदीकोपऱ्यांत
आठवणीची मंद झुळुक
कुरवाळीत बसते
हळुवारपणें—
सुवर्णमृगाच्या धूसर सांवल्या
तुटलेले श्वास घुसमटतात
अतृप्तिचे डंख असह्य होतात
पाठीचा ताठ कणा
अधिकच वांकतो
जीवनाचें वलय पूर्ण करण्यासाठीं
शून्यातल्या धरतीचा आकार
तोही शून्यच

# मी

नाजुक भावनांच्या कळ्यांवर
हळुवार फुंकर घालुन
आंत गुदमरलेला सुगंध
दशदिशांत फुलविणाऱ्या
कवीला मी शोधत होतो
दिव्यत्वाचा आस्वाद घेण्यासाठी—
यशवंतीचें नाजूक गूढ उकलण्यासाठी!
पण—

मला दिसला तो
मातीवर पोसलेला
मातीच्या गुणधर्मात भिजलेला
मातीचाच एक पुतळा
अष्टविकारांचे आगर असलेला
प्रतिष्ठा आणि कीर्तीची कवचकुंडले
मिळविण्यासाठी वेडा झालेला
फक्त शब्दांचा सम्राट
भावनांचा भाट
कोरड्या सहानुभूतीचा खजिनदार
त्याच्यात पाहात होतो मी
असामान्यत्वाची झालर
पांघरण्यासाठी हपापलेला
माझ्यातलाच मी—

# शरणांगति — नाही

जीवनांतल्या संवादी–विसंवादी सुरावरून
मी रक्ताळत ठेंचाळत चालतो आहे
तुला शोधण्याकरितां—
तुझा जाब मागण्याकरितां—
पण तुझी भेटच होत नाहीं
फक्त चाहूल ऐकूं येते
माझ्या पायवाटेवरून तूं गेल्याच्या खुणा
मागें ठेवून — होय —
तूं माझ्या आसपासच वावरतो आहेस
माझ्या जीवनाचा लगाम हातांत घेऊन
सहजपणें गतजन्माचा हिशेब जुळवीत
माझ्या पदरांत माप भरतो आहेस
पण––
तुझी ही जीवघेणी रीत मला पटत नाही
अदृष्टांतून बसणारे आसुडांचे फटकारे
रक्ताच्या चिळकांड्या उडवीत
मनाला खोल जखमा मात्र करतात
मन सूडानें धगधगतें आहे
दोन अनाकलनीय जीवनांतील कर्मफलांची
दुर्बोधता अगम्य आहे
तुझा न्याय अन्यायी आहे
आणि म्हणूनच माझा बंडखोर आत्मा
तुझे कठोर आघात सहन करीत
अखेरच्या क्षणापर्यंत
तुझ्या ह्या अन्यायाविरुद्ध
टाहो फोडीत
तुझा जाब विचारीतच राहील

# मला वाटतें . . .

असेल घडिली दुनिया देवें !
असेल दिधला जन्म मानवा
इंगित त्याचें त्याला ठावें
मला मतांचा नको गलबला

मला वाटतें आणिक पटतें
धकाधकीचें सोडुन जीवन
शांत सागरीच्या लाटांपरि
निघून जावें हांसत खेळत

'मीपण' माझें दुनियेमाजीं
माझ्याविण इतरां न आकळो
जन्म-मृत्युच्या मधलें अंतर
बर्फासम हळु वितळुनि जावो

कळो न कोणा कुठें जन्मलों
आणि संपलें केव्हां जीवन
गळो न कोणाच्या नेत्रांतुन
दयेंत भिजला बिंदु अश्रुचा

नकोच माझ्या दहनभूमिवर
उभवाया मातीचे मंदिर
पिढ्यापिढ्यांच्या गुजगोष्टींतुन
स्मृति माझी राहो नच शिल्लक

काळोखामधि अनोखाच कुणि
राऊळ मानुनि स्वतःस फसविल
दिवसाढवळ्या अंध प्रवासी
ना तरी घेईल शीर फोडुनि

येतांना आणिलें न कांहीं
ना आणाया कुणि सांगितलें
जातांना मज हवे कशाला
अन् देउं कुणा काय नेउनी

# विलासी ईश्वर

काय नको नीरांजन हें
ज्यांत प्राण तेवत राहे
काय तुझे डोळे दिपले–बिजलिच्या प्रवाहे

वाहतो मदाचा पूर
ज्यांत नाहते मंदीर
प्रीतिचा झरे निर्झर तुज–कसा अर्पिणार

गर्व आणि उन्मादानें
विटाळलीं सारी कवनें
वाहुं भक्तिची तुज सुमनें–कोणत्या करानें

सप्तसूर आणि सतारी
त्यांत रंगलासि मुरारी
ऐकुं ये न तुज हृदयिंची–गरीब एकतारी

भांग आणि विषवृक्षांनी
वेढिलें तुला दिनरजनीं
मात्र रोपटीं तुळशीचीं–तुडविलीं जनांनीं

नाथ अनाथांचा म्हणशी
अंकी घेऊनि श्री बससी
शारदा उभी बाहेरी–गात तुझी गाणीं

दीप अत्तरांचे जळती
वस्त्र भूषणी तव प्रीति
आणि लेवुनि फिरतो मी–लक्तरेंच सारी

## दुजा अश्वत्थामा

तू गेलीस अन् शब्द राहिले
तू गेलीस तरी फिरे सांवली
तुला न संजीवनी मिळाली
ओल्या तुझ्या स्मृतींना घेऊन
शब्दांचीं परि भूतें उठती
तूच मला जो मांडुनि दिधला
भातुकलीचा थाट पसारा
तू नसतां मज हवा कशाला
अनंत रूपें आतां फिरशी
सवें आपुल्या मला फिरविशी
असून नसतां पदोपदीं तूं
भासमान होऊन निसटसी
धरावया अन् तुझी सांवली
व्यर्थ भटकतो एकांतांतुनि
कधीं हास्य तर कधीं आंसवें
तुझ्या अगोचर कोमल हातें
आणुनि देशी आणिक पुसशी
शब्द तुझे कानांत गुंजती
रूप तुझें डोळ्यांत नाचतें
आठवणींच्या उभ्या मशाली
जाळितात आत्म्यास माझिया
मूर्तिविण देऊळ कासया
डागडुजी त्या करावयाची
चढोत चढती अनंत पूटें
झडो तयाचीं दारें खिडक्या
रंग उडुं दे मला कशाला
सुतक तयाचे
होऊं देत जे व्हायचें असे
ह्या देहाचे
नसूं देत जर तुला दयेचे
वरदान जरा
परि प्रीतिचा तुझ्या भुकेला
सहवासाविण व्याकुळलेला
भ्रमिष्ट होऊनि या संसारीं
माझ्यामधला पिसाट वेडा
अश्वत्थामा दुजा भटकतो

# एवढें वरदान दे

धार पाण्याची पुरे मज
घे जलाशय पूर्ण तू
दे कळी दे पाकळी
घे गुच्छ पुष्पांचा तुला
सांवली पानातळीं दे
वृक्ष घे कवटाळुनी
किरण आशेचा मला दे
विजय सम्राटी तुला
मान सेवेचा मला दे
लाख घे अधिकार तू
मान घे सन्मान तू घे
पृथ्विचा घे वारसा
नवकोट यादव घे तुला
मज एकटा यदुनाथ दे

## यौवन–माझें यौवन

स्वप्नांचीं बांधून विमानें
स्वर्गींच्या त्या पऱ्या संगती
नाचत खेळत—हांसत खिदळत
बघतां बघतां
शैशव माझे गेले निघुनी
मला टाकुनि
नाहीं वळुनि जरा बघितले
आणिक मी ही
उन्मादानें—मोह मदानें
होतो चालत
यौवनांतल्या नवमार्गावर
नजर रोखुनि—जरा नजिकच्या
कामदेव मंदिरासभोंती
होत्या तेथे
लचकत मुरडत
अगणित रंभा आणि मेनका
नृत्य–गीतांतुन
रास–क्रिडेचा फेरा फुलवित
भानही नव्हतें त्यांचें त्यांना
झिरझिरणाऱ्या तलम रेशमी
वस्त्राभरणीं
मधुघट होते—झांकुनि उघडे
मुशाफिरांचे करण्या स्वागत
धुंद लकेरी—
मस्त शर्वरी—
तसाच गेलो मंत्रमुग्ध नागापरी तेथें
आणिक पडला
गर्भरेशमी नागिणींचा मज पुरता विळखा
कुणास ठाऊक
केंव्हां सरले—तें ही मृगजल
आणि संपले
माझें यौवन —माझें यौवन

## गतस्मृति आणि मी—

मृगजलांतल्या जलाशयांतिल
स्मृतिशैवालीं फसतां मानस
शंख शिंपला या देहाचा
उरे किनारी अगतिक होऊन

हृदयव्यथेने तुटतां टाके
रसरसुनि लाव्हारस उसळे
अंगारांनी फुलतां क्षितिजें
शिंपल्यांतुनि मोती गळते

कांठावरची जळती रेती
जाळुनि देहा देतां जागृति
अश्रुसंगे पुसती स्वप्नें
कोठें मृगजळ स्मृतिशैवालही

मिटली स्वप्नें मिटल्या आशा
जोपासाया उरली माया
फिरे जीव धाण्यास जुंपला
गतस्मृतीचे बांधुनि डोळे

# विठ्ठला–हीच काय पंढरी

विठ्ठला–हीच काय पंढरी

वैकुंठीचा राणा पाहुनि
एकटाच मंदिरीं
वैकुंठीची स्वप्नें माझी
विरघळली सारीं–
विठ्ठला–हीच काय पंढरी

रखुमाईचा पती एकला
रखुमाईला सोडुनि आला
झुरत माय मंदिरी–
विठ्ठला–हीच काय पंढरी

तव नामाचा महिमा गाउनि
मृदंग टाळ का गेले दमुनि
संत झोपले बरीं–
विठ्ठला–हीच काय पंढरी

शील रक्षिण्या कान्होपात्रा
तुमच्या चरणीं देह ठेवितां
विटाळली नगरी–
विठ्ठला–हीच काय पंढरी

चक्र गदा पितांबर शेला
सांगा देवा कुठे विसरलां
विरक्त का हो उरीं–
विठ्ठला–हीच काय पंढरी

भक्तगणांची पापें धुउनि
भागिरथी का गेली आटुनि
बुडे द्वारकापुरी—
विठ्ठला–हीच काय पंढरी

## राक्षस—

माझ्या तारुण्याची कूस
बदलण्याआधींच
मला मरायचें आहे
मग वाट कशाला पाहूं ?
एकतर—
म्हातारपणी मृत्युशीं समर्थपणें
दोन हातही करतां येणार नाहींत
शिवाय—
अमाप पापें आणि
नकळत जमविलेल्या तुटपुंज्या पुण्यसंचयाने
स्वर्गाचीं कवाडें मला बंदच राहणार
पाताळ–मार्ग मात्र माझा हक्काचा
पण तेथेंहीं सैतानाच्या साम्राज्यांत
मिळायची भूतयोनीच
मग म्हातारें भूत होण्यापेक्षां
तरणें ताठें भूत कां होऊं नये ?
म्हणून म्हणतों—
तारुण्याची कूस बदलण्या आधींच
मला मरावयाचें आहे
माझ्या पापाचें माप
अद्याप पूर्ण भरलेलें नाहीं काय ?
तर मग—
मला पापाचे सारे सारे मार्ग दाखवा
त्या रस्त्यानें मला सुसाट
धांवत जायचें आहे
तरणें ताठें भूत होण्यासाठीं

## माझा वाढदिवस

वाढदिवस वाढवीत
दिवसांचें जड ओझें
द्यावया हिशेब तया
कचरतेंच मन माझें
भेटाया येतां मज
आज नवा जन्मदिन
स्वागतार्थ उठवेना
खचली तनु शक्तिहीन
पुरुषार्थाच्या जमेंत
उघडाया पान नवें
हातचा उरे न एक
द्यावयास कर्ज हवें
कालप्रवाहात पडे
एक आहुती नवीन
एक खांब गळुनि पडे
इमारतिस वांकवून
एक एक मैलाचा
दगड मागुता पडतां
ओरडून जणुं सांगे
संपला प्रवास अतां
आले गेले अनेक
दिवस ह्यापरी असेच
कालमापनास ठरे
अस्त्र मृत्युचें जुनेंच
जीवनपथ उजळाया
घेउं शपथ का जुनीच
विस्कटतां घडि न पुन्हा
राहिल पडुनी तशीच
वात जुन्या दीपांतिल
तेलाविण काजळली
आणि उभ्या जन्माची
स्वप्नें माझी जळली

# तुझी पाउलें

निघालों तुझ्या दर्शना वंदना
मधें भेटली नाहतांना नदी
किनारेच दोन्ही तिचे भेटले
तुझीं पाऊलें पाहिली मी तिथें

खुलीं माळरानें पदीं लोळतीं
लतावृक्ष रानींवनीं डोलती
मधें पायवाटा किती भेटल्या
तुझीं पाऊलें पाहिली त्यांवरी

मदोन्मत्त हत्ती कड्यांच्या रुपें
दुजे मेरु-मंदार होते उभे
विसावे नभाची कडा त्यांवरी
तुझ्या पाऊलांची दिसे सावली

निळ्या सागराच्या कुशीं-मस्तकीं
झुले शाल फेनील लाटांवरी
करोनी झुला खेळताती पऱ्या
तुझीं पाऊलें तेथ झंकारलीं

निघाली निशा चोरट्या पाऊलीं
धरोनी शशीच्या करा माऊली
सवें लाख तारा धराया दिवे
तुझीं पाऊलें पाहिलीं त्यांत मी

अणूरेणुमाजीं नवी चेतना
निवे द्यावयाला उषेचा पती
प्रकाशांतले थेंब न्हाणी धरा
तुझीं पाऊलें त्यांत तेजाळलीं

मिटे पापणी लीनतेच्या पदीं
भिजे आंसवांच्या जलीं अंजली
हृदीं पाकळ्या जाहल्या मोकळ्या
तुझीं पाउलें त्यांत होती उभी

## बिचारा पुरुष—

पुरुषाच्या जीवनांत उफाळल्या उन्मादाला
उमलत्या यौवनाने प्रतिसाद देत
स्त्री प्रवेश करते
दोन जीवांचे मीलन होते
एक सुंदर जग सजतें–फुलतें–फोफावते
पण क्षणभरच
अचेतनांत न रमणारे पुरुषी मन
कल्पनेच्या स्वर्गांत
अधिकाधिक झेपावूं लागते
पृथ्वीवरील संसार हाच स्वर्ग
मानणारी स्त्री–हळुहळु
आपल्या नाजुक आणि कोमल
भावनांच्या बिसतंतूनी
विणलेल्या कोशांत
त्याला गुदमरवुन टाकते
आणि तोच त्याला स्वर्ग वाटतो
नकळत–विश्वासाने–आनंदाने
स्वतःला त्यांत गुरफटवुनही घेतो
स्त्रीचे इप्सित साध्य होते
मातृत्व–प्राप्तीने–
तिच्या जीवनाचा केंद्रबिंदूच बदलतो
नराचे अस्तित्व ती पूर्णतया
विसरूनही जाते
स्वच्छंदाने बागडणाऱ्या फुलपांखरांचे
पंख कापून आकांक्षेच्या शिरोभूषणांत
नवनवीन तुरे खोविण्यात–
स्त्री रंगून जाते
अष्टभुजेच्या आवेशांत–
शिरकमलांच्या मालेंत
आणखी एका नरमुंडाची गुंफण होते
नव्या स्वप्नाची बांधणी जुळविण्यासाठी
स्वतःच गुंफलेल्या

नाजुक कोशाचा
एक एक धागा
ती पुन्हा उकलीत बसते
स्त्री जातीचें गूढ
पुरुषाला कधींच
आकललें नाहीं
आकलत नाहीं
आकलणारही नाही
बिचारा पुरुष—

## जातीचे नंदी

आहे का तुजपाशीं
पाणपोई शब्दांची
कलश स्तुतीचे भरूनी
वाटेच्या वाटसरा
द्यावयास—ओसंडून

आहे का तुजपाशीं
भांडार पुरें भरलेले
द्यावयास गरजूंना
परतीच्या बोलीनें
क्षण दुसरा विसराया

आहे का तुजपाशीं
सेवेचा साज पुरा
पाप असो अपाप असो
गज असो भुजंग असो
दिनरात्रीं राबाया

आहे का तुजपाशीं
दगडाचें मानसबल
ऐरणिचा ऐरावत
येईल तें झेलाया
घाव घाव पचवाया

आहे का तुजपाशीं
हंबरण्याचा अभाव
बैलाची सोशिकता
घाण्याला वर्ष पुरें
चुकला दिन पोळ्याचा

नांवाचा तूं नंदी
शान स्मशानींच तुझी

## मावळतीचा चंद्र उपाशी

मावळतीचा चंद्र उपाशी
थकला-दमला हा दरवेशी

थकले मृग थकलाच सारथि
ढळे न वितभर रथ आकाशीं

नीलांगण वैराण जाहलें
थेंब न उरला मेघापाशीं

तेज गळोनी विझल्या तारा
दूर राहिल्या घरच्या वेशी

## नवी जडणघडण

वाटतें का
कांटेरी करवंदांची उतरंड
पहा वांकुन
असे ही नवकाव्य कणिका
रचिता होतसे डोंगर
ओबड धोबड
वाहती आंत
रसवंतीचे ओघळ
नसेही कांटेरी करवंदांची उतरंड

शब्दांचे फाडुनि टरफल
बुद्धिचें टोंचुनी दाभण
अनर्थाचा उल्लंघिता चिखल
गाभाऱ्यांतिल
मांसल अर्थाचे रसग्रहण
देईल
करवंदांची ही उतरंड

लालित्याचें टाकुनि पैंजण
पितळी घुंगुरांचा नाद
गोळा करून
ऐकवि मंजुळ किणकीण
मिसळला त्यांत
तराण्याचा लयबद्ध गडगडाट
नसेही कांटेरी करवंदांची उतरंड

परिटाच्या इस्तरी विणा
घरची रेशमी घडी
बघा हात लावून
उचलुन तोलुन
दाखवा तज्ज्ञांस
भिजविले तुतिच्या रसांत
नवकाव्याचे भरजरी दुकुल

भराया
शारदेची ओटी
दुमडला खण
नसे ही
कांटेरी करवंदांची उतरंड

कांहीं हिरवी कांहीं कच्ची
बाकिची तरी पिकली
असोत कशिही
तरीही मांसल करवंद
रसाचा गुणधर्म
शक्यांशाने चघळुन
मनाचा कायापालट
करायचा तरी
घ्या निवडुन
नसेही कांटेरी करवंदांची उतरंड

दिसते ना
शब्दांचे नर्तन
भावनांचें संमेलन
अनुभूतीचे संकलन
नसे हे वनवासी आक्रंदन
असे हा
बेफाट शिस्तबद्ध गतीचा स्पंदन
नसेही कांटेरी करवंदांची उतरंड

म्हणूनच ठेवियली पुढती
रसिकांसाठी
नसे हा
रक्तमांसाचा चिखल
नसे ही
कांटेरी करवंदांची उतरंड
असे ही
आधुनिका काव्यकलिका

# श्वान आणि मन

गाडी चाले वारा पिवुनि
श्वान धावले तिच्या मागुनि
रान जिवाचें अपुल्या करुनि
निराश परी होऊनि
परतलें रक्तानें न्हाउनि

भूमी निसटे पायाखालुन
ऊर फाटला श्वास टाकुन
पुढेंच तरीहि धावतसे मन
ध्येयाच्या मागुनि
यशानें फुलवाया मेदिनि

कांचनमृग मृगजलासमान
ध्येय निसटते मनास फसवुन
मृतदेहा आशेच्या वेऊन
येई तें परतुनि
उठवि जड तनुस धूळ झाडुनि

## बन्दा रुपया

बन्दा रुपया–बन्दा सेवक
हातीं आला कलदार पुरा
बन्दयाच्या परि नजरबन्दिने
मीच तयाचा झालो बन्दा

गौरांगाला मोहक झिलई
राजभूषणें कटिखांद्यावर
गतकाळाचें वैभव त्याचें
आठवून ये नयनी पाणी

महिनाभर संसार व्यापुनि
पै–पैशांतुनि उरला होता
आज हवे जर मुठभर दाणे
रौप्यतुला रुपयांत बांधतो

लोकशाहिचा नवा जमाना
राव–रंक जगतास सारखे
तूं तर शाही बंदा सेवक
तुला शनीचे नडले फेरे

वजनदार तव पूर्वज होते
तुझे वजन तर तोळा मासा
तशांत पाडुनि टिकल्या शंभर
नांवही बदलुनि ‘ नवे ’ ठेविलें

म्हणो मला कुणि कंजुष लोभी
म्हणोत म्हणतिल कवडी चुंबक
इभ्रत अब्रु तव राखाया
माझी इज्जत पणास लाविन

खानदान तव कुला स्मरोनि
माझ्या हस्तें दगा न देइन
भर बाजारीं निर्दयतेनें
कवडीमोलें तुला न खर्चिन

तव देहाचें व्हाया सार्थक
हविर्भाग ही वरुणा द्याया
हात जोडुनि नदीत भरल्या
डोळे मिटुनि तुजला ढकलिन

# धारणा

नार गर्भार चालली
तेज रायाचें उदरीं
पडे केशरी देहाची
एक चंदनी सांवली
नयनांच्या सांदीतून
लाज घरंगळे गालीं
मुखीं वलय तेजाचें
पायीं वैशाखी चाहूल
शब्द मोहरून येतां
पडे प्राजक्ताचा सडा
उरीं अमृताचें ओझें
गेली कर्दळी वांकून

## विनवणी

या लाडक्या लतेला टाकून मेघराया
कां चाललासि ऐसा लावून मोहमाया
क्षण थांबल्याविना तूं जाऊं नको असाच
नयनांत सांठवूं दे तव रूप एकदांच
कां ऐकतां न माझें जाशी पथेंच अपुल्या
कुल शील काय माझें तूं शंकिलेंस राया
मग जीवनांत माझ्या आलास तूं कशाला
कड दावुनी रुपेरी कां मोहिलें जिवाला
जर मार्ग जीवनाचे रे आपुल्या निराळे
हें जाणितां न आधीं कां वेड लावियेलें
रथ वायुचा तुला रे हें विश्व धुंडण्याला
मी जन्मलें परंतु या भूमिच्या कडेला
मी वेल कोमलांगी बघ वाळलें उन्हानें
परि साउलींत तुझिया मज जन्म ये नव्यानें
मी प्रीतिची भरारी गगनांत मारतांना
तूं प्रेमवृष्टि करुनी भिजवीयलें मला कां
मम जीवनांत क्रांती केलीस त्या क्षणाला
पुलकीत देह झाला ये रंग जीवनाला
हें एवढें करोनी तूं चाललास कोठें
राणी तुझी म्हणाया तुज लाज काय वाटे
कां चंचला कुठोनी भुलवी तुझ्या जिवाला
क्षण दीप्तिचा तिच्या रे तुज मोह काय पडला
ती अप्सरा नभींची तुज नृत्य गायनानें
लावून आस खोटी जाईल–सत्य जाणे
स्वच्छंद जीवनाचा तूं नेहमीं भुकेला
हें शोभतेंच सारें पुरुषी तुझ्या मनाला
माझी मलाच झाली जड पाउलेंच राया
अबलाच मी, न माझ्या हें सोसवे जिवा या
हृदयांत रे परंतु तव रूप सांठवीलें
साकार होउनी तें बघ रे फळास आलें
निष्ठूर तूं परंतु वदु कोणत्या मुखानें
तव रोम रोम भरला कीं प्रेम जल रसाने

कीं प्रेमपत्र हृदयीं घेऊन चाललास
तूं मेघदूत, द्याया—तें पत्र यक्षिणीस
प्रेमार्द्रता तियेची जरि ठाउकी तुला रे
मग टाकुनी मला कां जाशी पुढें असा रे
जाणे तुला जरी रे राही कुठें खुशाल
आशेवरीच तव ही वाढेल प्रेमवेल
तूं भेटशील मातें केव्हांतरी असाच
या एक भावनेनें राहीन मी इथेंच
परतोनि भेटण्यातें येशील त्या क्षणाला
मम पुष्प जीवनाचें वाहीन त्वत्पदाला

## तूं घरांत—मी बाहेर

सळसळतां हिरवा चुडा
ये मंजुळ किणकिण कानीं
उमगतों मनीं कीं
पाठी उभी पट्टराणी
नवोढा—

सळसळतां हिरवा चुडा
हेलावत उर्मी अंतरीं
जीवनाची शक्ति सारी
घालु लागते रुंजी
अभिलाषेच्या पदीं
उन्मादें—

सळसळतां हिरवा चुडा
इहलोकिंचे ईप्सित
दिसे रेंगाळत
उंबरठ्यावरीं
घुटमळे नजर ओढाळ
पापण्याआड
लचकतांच तिरपी मान
चोरटें हास्य नाजूक
दातांतळिंच्या अधरांतून पाझरे
मोहाळु—

सळसळतां हिरवा चुडा
हळदीनें रंगली साडी
फडफडुनी माजघरीं
करीतसे हळुच चहाडी
" इथें हृदयाची स्वामिनी
आसक्तिनें भारुनि
उगीच घाली येरझारा
चुकवुनि आईचा पहारा
मायाळु "—

सळसळतां हिरवा चुडा
दोन मांसाचे पुतळे

अचेतनीं करिती चाळे
निरर्थक रिकामे
दोन मनांचीं पांखरें
अनंतांत झेंपावती
नकळत—

सळसळतां हिरवा चुडा
कानांत उभें ठाकतें
तृषित मानस
चाहूल तरंगे
पैंजण नाद–निनादीं
फिरतेच नजर घेऊन
उभा कानोसा
चोरून टिपुन घे
यौवन प्रांतातले
चढउतार
रसरसलेले—

सळसळतां हिरवा चुडा
तूं घरांत–मी बाहेर
परि सांगे जाणिव
'तुझी संपदा फिरते'
अन् लोंचट मनही
फिरे पाठुनि
घेऊन मालकी हक्क

## पुरते–पान पिंपळाचे

सांग तुझे माझे नातें जगा ओरडून
नको कुणी शंकित मानस बघाया वळून
एक हात तुझिया हाती ठेविला सुकेशी
हात दुजा नेइल तुजला ध्येय मंदिराशी
सात पावलांची झाली चाल एकसाथ
स्वामिनीस सोबत आहे स्वामिनिचा नाथ
एक साथ ताळावरती पाऊले पडू दे
एक जीवनाची स्वप्नें प्रीतिला बघू दे
उंच घे भरारी प्रीती सोबतीस आहे
विसाव्यास सारी धरणी मोकळीच राहे
कंस वा दशानन येवो शान ना कुणाची
जिद्द असे माझ्यापाशी राम माधवाची
प्रलयकाळ येतां होते वांकडे कुणाचे
बालमुकुंदाला पुरते पान पिंपळाचे
तोच तुझ्या उदरी येइल रक्षिण्या जगाला
अभयदान त्याचे लाभे शुद्ध प्रेमिकाला

## आधुनिक मच्छिंद्रनाथास...

योगबलानें–तपोबलानें
आत्मोन्नती साधलीस
गेलासी इतरांहुनि अधिकाधिक
प्रभुच्या चरणाजवळी
म्हणुनि वंदितो तुला मुनिवरा
माझा घेई प्रणाम

पुढें परी जायचे सोडुनि
ठाण मांडुनी मायाजाली
चमत्कृतीने भक्तां भुलवुनि
विभूती पूजा
घेसी करवुनि
म्हणवुनि परमेशाचा प्रेषित
भाविकास भुलविशी–कासया
अधःपतन हे आत्म्याचे तव
अहंकार घडवितो

संसाराच्या सागरांतले
काम–क्रोध–लोभादि जलचर
अंगावरि खेळविसी–लीलया
भूल पडोनि
तोल परी जाईल केधवां
मंत्र विसरतां––
नागेंद्रचि बघ–खेळवितो गारुड्या

सर्वांभूतीं एकच आत्मा
हेंच सत्य इतरांस शिकवुनि
गुंतविसी कां अपुल्या जाळीं
देऊनी आशीर्वाद शापही
उधळितां पुण्याचें कोठार
होशिल कंगालापरी
देशी अवनतीस आमंत्रण कां ?

आत्म्याची आत्म्यास शिकवणी द्याया
गुरुपद तुजला दिधलें कोणी
जो तो राहिल

जाणुनि भुवनीं
समर्थ आहे—ज्यानें घडिलें
हें ब्रह्मांड अपार—
कराया दीनांचा उद्धार

भगवंताच्या मुखीं घातली
व्यासांनीं गीता
नको जगाच्या मुखांत घालूं
तुझी दिव्य (!) गाथा
अहंमन्यता अथवा असुया
जेव्हां घेईल ताबा मनिंचा
पडतिल तत्क्षणिं गळुनि
लाविली कवचकुंडलें
आणिक मुकशील महात्म्यापदास

हिमालयाच्या निबिड काननीं
ध्यानमग्न हो
कितीक आत्मे
तुला सोबती अनंत तेथें
अनंत पटीनीं
श्रेष्ठ तुला ते
राहती प्रभुच्या पदांबुजी
धुंद भक्तिमाजी—
सोडुनि मायेचा पसारा
तेंच स्थान तव
तेथें जा......तेथें जा

## इकडुनि उगाच भांडायचें

ध्यायचें जवळ मला सोडुनि
इकडुनि उगाच भांडायचें

दोन जिवांचा संगम होतां
जीवनौघ जीवनी मिसळतां
नकळत हातुनि प्रमाद घडतां
सांवरून ध्यायचे सोडुनि
उगाच भांडायचें

भोळीं भाबडी राणी तुमची
लाखामधली स्वारी इकडची
मला नखाची सर न यायची
सांभाळुन ध्यायचें सोडुनि
उगाच भांडायचें

पूर्वजन्मिचें भाग्य उदेले
पदरी घेऊन मज उद्धरिलें
सेवा म्हणुनि करण्या आलें
हांसुनि बोलायचें सोडुनि
उगाच भांडायचें

रूप गुणांवरी जीव मोहुनि
मंत्रमुग्ध डुलतसे नागिणी
मान जिवाचें जातां हरपुनि
उणें अधिक व्हायचें इकडुनि
उगाच भांडायचें

# माती

तूं धरणीचा पुत्र, मानवा
ठेव धरणीचा मान
मानवा, व्यर्थ नको अभिमान.

परमेशाने अंश आपुला
धरणीच्या ओटींत घातला
जीवनसत्वें तुला अर्पुनी
वाढविली तव शान

ज्या मातेनें तुला पोशिले
आशेने तुजकडे पाहिले
आत्मयज्ञ तो नको मालवूं
नको तिला बलिदान

विसरतांच तूं मातेचें ऋण
उसळुनि येती मातीचे कण
ऐक मातीची हांक
जिवाचा करुनिया तूं कान

ओढ मातिची करितां किमया
विझेल ही मातीची काया
दानाचा अपमान करोनी
ठेवितां न अवधान

# फाटकें चित्र

क्षितिजा आडून कुणी
फुंकर घालीत नभीं
मालविण्या पांडुरकी
मालवती चंद्रज्योत
मावळती चंद्रकोर
निःश्वसुनी शिंपितसे
निष्प्रभसें चांदणेंच
फुलवाया रजनीला
प्रीतीचें हास्य फिकट
निःशब्दांच्या वलयीं
जन्मतांच जणुं मेलें
विरघळलें शांततेंत
टाकित उच्छ्वास हळुच
शांत पहुडला निसर्ग
लाजेनें शरमेनें
मानवता मुख लपवी
निर्जिव अवशेष जुने
उरलेल्या अवसानें
उंचाउनि मान रडत
निश्चल राहून उभे
एकाकी फडफडत्या
पंखांचा बद्ध नाद
सुतकी वातावरणा
घुसळित जाई उगाच
थंड पवन हृदय चिरित
सजिवतेस चुरगाळित
चित्र फाटकें मनांत
राहि सलत सारखें
गगनाच्या पोकळींत
नजर हिंडते भकास
तरिही फिरत एकटाच
बघण्या ती चंद्रकोर

## वीणे

वीणे—मधुर मधुर तूं बोल

जादुगारिणी तूंच यक्षिणि
शृंगारित ये सूर रागिणी
घेई तान विलोल–वीणे

प्रीत-मंजिरी निरांत फुलवि
हृदय-परागा हलुच डोलवि
होऊनिया चंडोल–वीणे

थरथरत्या गे कमलदलाना
मुग्ध होऊनि ऐकवि ताना
स्वर जमवुनि अनमोल–वीणे

भुजंग विसरे वैर विषारी
डोलविते गोकूळ बांसरी
गुंफुनि मायाजाल–वीणे

तरंगत्या स्वर्गीय सुरांनीं
कणकण माझा आला बहरुनि
फुलुनि मानसवेल–वीणे

## शंकरा नटूं देत पार्वती

जुळलीच रंग–संगती
शंकरा नटूं देत पार्वती

अंगांगाला भस्म फासुनि
रागावुनि गेलास स्मशानि
जटेंत राख किती—शंकरा नटूं देत पार्वती

अलंकार शृंगार लेवूं दे
डमरुच्या तालांत नाचूं दे
गाऊं देत आरती—शंकरा नटूं देत पार्वती

नीरांजन अंजलीत घेऊनि
उमा निघाली तुझ्या पूजनि
तूंच उमेचा पती—शंकरा नटूं देत पार्वती

गौरीहरा शृंगार नावडे
सर्व तपस्वी असेच वेडे
वेडा तूं पशुपती—शंकरा नटूं देत पार्वती

कमंडलु-व्याघ्रांबर लेवुनि
सजतां गौरी-पाही निरखुनि
हिमालयाचा यती—शंकरा नटूं देत पार्वती

## गान कोकिळेस

यक्षकन्यके
अशीच राही गात महालीं
पुरे मला ती
तान तरंगत पडतां कानीं
श्वास गिळोनी दूर इथे बैसलों
ना तरी–
दचकशील गे मजला बघतां
आणिक जाईल गानसमाधिस
तडा उभाची

मला जन्म नच राजहंसकुळीं
नकोच माझी छाया काळी
तुज स्पर्शाया
काळोखांतचि म्हणून बसलो
आनंदाचे आंसू ढाळित
हीच अर्पितों भावनांजली
तुझ्या कमलदली

घेई तान अन् तशीच जाई
त्या तानेसह वरती वरती
घेऊन गिरक्या घुमवित वलयें
धुंद सुरांचीं

दरवळलें बघ आसमंत गे
दिग्गज तेही उभे दहाही
काळ थांबला भान भुलोनी
अगांगांतुनि तान घुमोनी
फुलली रोमांचाचीं शेतें
असतिल जमले थवे सुरांचे
तुज ऐकाया अनाहूतपणें नीलाकाशीं
खुलव सजावट सप्तसुरांची तिन्ही सप्तकीं
सूर-सागरा घे मंथोनी

हृद्सारंगी माझी इवली
इथूनीच गे तालावरती
साथ करोनी
घुमविल ताना-आलापांना

माझी दृष्टी तुला न शापिल
रूप गुणांची माझ्यापाशीं
नसे संपदा
मोह मदानें जी उधळोनी
मला न जमलें पापाचें लव माप भराया

फत्तरांतल्या कडेकपारीं
वाहे माझा निर्झर निर्मळ
शिंपडीन मी अमृत त्यांतिल
तुझिया पायीं शुध्द प्रीतिनें
कर उंचावुनि दूर इथूनचि
गान कोकिळे,
तुजला नकळत
तुझा पुजारी असाच राहिल
तुजला पूजित

## स्वप्न-मंथन

हें होईल ना कधिं स्वप्न पुरे
ती आत्मवंचना थांबवि रे

मनोरथाच्या रंगमहालीं
मीलनास जरि आसुसलेली
लटक्या रागें–राणी रुसली
निद्रिस्त रंक–घेता सखि-चुंबन
ये हातीं उशाचा पत्थर रे

हरित तृणांकित रम्य काननीं
मत्त गजेन्द्रा, मनिं लोभावुनी
धांव–धांवतां–प्रिये मागुनी
चित्कारसि कां–कांटा नच, शिरीं–
खुपत धन्याचा अंकुश रे

रुमझुम नादे मन हेलावत
स्वर्गीची अप्सराच नाचत
सुखसदनिं नेण्या कर ओढित
दास न मंत्रीं–राजदूत हे
शृंखलांत तूं कैदी रे

आकांक्षा—मेरु उभवोनि
कल्पनाच वासुकी करोनि
स्वप्नांचा सागर घुसळोनि
करितां अमृत–मंथन–जहरीं–
कटु सत्याचा कलश भरे

## तूंच म्हणालीस

तूंच म्हणालीस–पहिल्या भेटींत
गतजन्माची येतां चाहुल
ओळखिलें, वरिलेंच मनानें

तूंच म्हणालीस–छाया होऊन
जन्मोजन्मीं तुमची राहीन
धर्म सतीचा नितांत पाळीन

तूंच म्हणालीस–तुमच्यासाठींच
घर सांभाळीन आणिक सजविन
फळाफुलांनीं शोभा आणिन

तूंच म्हणालीस–तुमच्या पुढतीं
ताट सुखाचें भरलें वाढिन
दुःखाचा वांटा मी उचलीन

मधेंच भरल्या संसारातुनि
मजला नकळत गेलिस उठुनि
विसरलीस का आणाभाका
अशी मनाला येतां शंका

आभाळांतुन तूंच म्हणालीस–
नव्या घराची करण्या आवर
पायघड्या आंथरण्या मार्गी
आलें धावुन तुमच्या आधीं

आतां सजली शय्या–मंचक
खुशाल या हो राया हांसत
उशास तुमच्या द्याया मांडी
नयनांचे नंदादीप लावुनी
बसलें ठेवुन खडा पहारा
शब्द सतीचा नाहीं खोटा

## वारांगनेची पोर

: १ :

तापलेल्या आणि पिकल्या
यौवनाचे कणस
बुंदी टपोरें
घ्यावया चाखून गोडी
येति धावुनि
कावळे ते अन् गिधाडे
राजहंसाच्या बळें
घ्यावया रस यौवनाचा
टाकुनि द्यायास चोथा
वांकतां देठातुनि ती
तुडवुनि प्रेतें जुनीं
रान शोधाया नवें
जाती पुढें—
त्या स्मशानीं वाढलें मी
थांबलें वेशीवरी

: २ :

पलीकडे कोरीव लेणीं पत्थरांची
गौतमाच्या वारशाचा
करित दावा
असती उभी
यंत्रवत् संसार चाले
त्यांतुनि
त्याच त्या साच्यांतुनि
नीरसतेनें
मुखवटे लावून खोटे
नाटकाचीं तींच पानें
सरकती पुढें
तोच अभिनय
त्यांत भिजलीं
तींच ती–घोटीव गाणीं
त्याच त्या घोटीव नकला

फाटल्या सांध्यावरी
रंग फांसोनी नवे
फसवितातो एकमेकां
अन् स्वतःला

: ३ :

संधिकाळीं तेथुनि
टाकुनि रंगीत बुरखे
मूळच्या रूपी नटोनी
कावळे ते तीं गिधाडे
" जेकील " ते " हाईड " तेचि
येथ येती
कुरतडाया कणस नवें
बुंदी टपोरे
नौबती त्यांच्या रुपेरी
वाजती मार्गें पुढें

: ४ :

साज नुपुरांचा पदीं
गान ओठींचें नवें
घेऊनि शोधीत येथें
पंकजा मी
या स्मशानाच्या अन् लेण्यांच्या
सीमेवरी
अर्पिण्यातें अर्घ्यदाना
हृदयेश्वराते
ऐकण्या त्या पदरवातें
गंजली पाषाण मूर्ती
शांत-स्थिर जरी
दूरच्या रानींवनीं
एकाकिनी
राहो कुठेंही
तोच माझा देव आहे
तोच माझा मोक्ष आहे

पार्वतीचा सांब भोळा
शोधीत आहे मी कधीची
या स्मशानीं रानींवनीं
पत्थराच्याही रुपानें
घेईल माझी ओंजळ
भिजली जरी अश्रु-दंवांनीं
सुकली जरी पायावरी
लाथाडुनी देईल ना जो
चिंतनीं त्याच्या उभी मी
या इथें—वेशीवरी—
स्वप्नांत का मी ?

## वळाली पाऊलें उद्यांकडे—

जीवन संग्रामांत वितळलीं
आजकालचीं
भाकितें जुनीं
पराजयाच्या सांवल्या
शृंखले समान–
गुंतल्या पायीं
धैर्यांचा मेरुमंदार
वितळे–
मेणासमान
पडे—
चैतन्याचें पात्र कोरडे
वाटे–
मंदावली विश्वगति
मरगळल्या मनें
जडतेचें ओढित ओझें
ठेवितां पाऊल उंबरठ्यावर
स्थीरावलीं लोचनें निश्वसुनि

निरामय शांतीचें स्वरूप
पसरले–मंचकावरी
कोंवळ्या बाळाच्या ओंठी
लोलावुनि स्तन
शांत झोंपल्या मातेच्या मुखीं
आणि —
उमलल्या मखमली हिरड्या
विस्कटुनी गुलाबी गालीचे
निथळे निर्व्याज हास्य

शक्तीच्या साऊलींत
सौंदर्य पहुडलें शांत
गळुनि पडे इथें
कुसुमधन्व्याचे चाप

लोपलें पाप
उन्मादाचें माप
रितें पडे
आशेचा नंदादीप
तेवतो प्रशांत
दरवळे पावित्र्य सुमंगल

वामनाचीं पावलें इवलालीं
व्यापुनि त्रिखंड
अनंतांत हिंडती
शोधाया धरणी नवी
—बाळरूपें—
उमटला प्रीतिचा ठसा
अमरत्व ये जीवना
काळावरी मात
इथें करी–मानवता
आणि मिळे हृदया
संजीवनी
पिवुनी नवजीवन
वळालीं पाऊलें
उद्यांकडे—

# पहिली रात्र

अशी ती रात्र येते
नाजुक पावलांनी
उत्कंठा–प्रतिक्षांचें गाठोडें घेऊन
ऐकूं येतात त्यांतून–
आसक्ति–प्रीतिच्या भावनांचे झंकार
दोन बुजरी मनें क्षणभर संकोचतात
आणि स्वर जुळतात–मनाचे–देहाचेही
अभिसार अनिर्बंध होतो
एक आवर्त इथेच संपते
दोन चुरगळलेलीं मनें आणि देह
पुन्हा वळवळूं लागतात
यौवनाला पुन्हा उधान येते
दुसरें आवर्तही असेच संपते
केव्हांतरी उत्तररात्र येते
दंवानें ओलीचिंब झाल्याचें पहाट सांगते
उत्तररात्रीच्या बाहुपाशांत गुरफटलेला चेहरा
गुलाबी सौंदर्यानें नटूनही म्लान दिसतो
एक निर्माल्य मागे ठेवून—
विरहाची रात्र ओसरते
मीलनांतिल उन्मादक वासाला
दंवाने भिजलेली पहाट
मिस्किलपणे हांसत असते
मोगऱ्याची चुरगळलेली कळी
एका कोपऱ्यांत लोळत असते
पहिल्या रात्रीचें शेवटचे आवर्त
येणाऱ्या रात्रीच्या पहिल्या आवर्ताकडे
आसुसल्या नजरेनें पहात असते
पुन्हा फुलण्यासाठीं—
फुलून पुन्हा निर्माल्य होण्यासाठी—

## पहिला पाळणा

येईल एक दिन
अन् घेईन
मी रंगीत पाळणा–ठेविण्या प्रीति–नजराणा

बालमुकुंदा–कुशींत लपविन
मातृहृदींचे अमृत भरविन
तीट काजळी–लाविन भाळीं
रक्षिण्या–येतां कुणी पुतना

उघड उघड चुंबिण्यास सखया
लाज वाटते आलिंगाया
बाळरूपाची–प्रतिमा त्यांची
मनीषा पुरविल मम राणा

झोंपेंतची मज जाग येतसे
स्वप्नीं कुणी हुंकार देतसे
दावित माझा–उदरी राजा
वीरवर–अभिमन्यूच्या खुणा

चंद्रासाठी हट्टहि धरितां
सर्वे घेऊनि मीच दश–रथा
गांठुनि नभिंच्या–मृगाधिपतीच्या
लाख नव–देईन तारांगणा

वीरपत्नि होईन वीरमाता
भाग्य एवढे मला लाभतां
अरुंधतीचे–स्थान सतीचें
भूषविन–वंदुनि पतिचरणा

# कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेस

एकदांच गे, उचलुनि पाही
मान ल्हाळी
नवथर जिवणी
बावरलेल्या हरिण शावकाचे डोळे
निळे नव्हाळे
मोहक भोळे
नकोस काढुं अभ्रपटल गे
धूम्रवलयिचें—चंद्रावरचें
कुलीनतेचें तेज निथळुंदे तसेंच त्यांतुन
निघू देत गे, न्हाउनि सारी
राजसभाही—पावित्र्यानें
निरंकुश मज नकोस शंकू
नकोच किंतू मनांत ठेवूं
अन् भांबावूं
कुशींत असल्या
जन्म घ्यावया
भाग्य प्रभू जर मजला देता
राजिव नयने !
दख्खनचा मी झालों असतो
रघुकुलदीपक दुजा—मंगले !

नजर उचलुनि
नयनदळींच्या पुष्पपरागा
उधळीत पाही
जशी जिजाई—आणिक जाई
पाकदिलानें
सन्मानाने इतमामानें
कोणि न परके
नर—केसरिच्या ह्या दरबारीं
माझ्या दारीं तुला न वैरी
अभय—माऊली—वचनें दिधलीं
जा परतोनी—पतिच्या सदनीं
घे नजराणे पदीं ठेविले
सौभाग्याचें घेई लेणें
घेई मुजरा मऱ्हाठमोळा
ह्या शिवबाचा

## उपेक्षितांचे अंतरंग

नसे अधिक वैशिष्ट्य चातुरी
परि नातें ओळखीस गांठुन
अधिकाराचीं वस्त्रें लेवुन
सम्राटाचा कैफ मिरविती

न्यायनीति डावलूनी बसती
असे मुखवटे हुकमतीवरी
पदोपदीं त्या मुजरा करितां
स्वाभिमान घे डोळे मिटुनी

सत्तेचा मद नयनीं चढतां
धुंदीला जग क्षुद्र वाटतें
दैवाचे प्रेषीत कल्पितां
निर्दयतेला पाणी चढतें

दांत पाडितां सहज लीलया
भुजंगता असहाय होतसे
अपमानाचें शल्य बोचतां
फडेस उठल्या लाथ हाणिती

श्वानांच्या पंगतींत बसण्या
वनराजाच्या आलें नशिबीं
हीनदीनता पदरीं येतां
खानदान मातींत मिसळतें

राणीचें लेणें दासीच्या
अन्यायानें शिरीं चढवितां
आमंत्रण सैताना मिळतें
स्वैर घालण्या पिंगा भूवर

दांभिकतेच्या पडद्यामागिल
घाण जिवाला उबग आणिते
त्वेषानें पौरुष परि उठतां
वेसणींतुनी रक्त ठिबकतें

जळे जीव काळीजहि पिचतें
संतापहि खदखदे मनांतुन
अगतिकतेच्या जाणिवेंत परि
बृहन्नडेंतिल पार्थ तडफडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २००८६ वि: ५१०१
क्रमांक २१८८ नों. दि: २८/७/७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २००८६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## फुलवा—

कुणि नांव ठेविले 'फुलवा'—
फुलवा, नभांतला चांदवा
बहरला पुष्पांचा ताटवा

कुणिं नाकावर ठेविली ग चाफेकळी
गालावर फुलवि–गुलाबीच पाकळी
नयनांत नीलकमळेंच फुलविलीं कुणी
तुझ्या ग फुलवा—

कुणिं रंग केतकी अंगाला लाविला
ओठांवर जास्वंदीचा रस ओतिला
दावितो मोतिया मोगरीच्या नव कळ्या
चेहरा हंसवा

कुणिं सूर्यफुलें कानांत तुझ्या खोविली
सुकुमार जाई देहांत तुझ्या फुलविली
हृदयांत लाजरी प्रीत–नवतिची ज्योत
तुझ्या ग फुलवा

उरीं मादकता ज्वानिची तुझ्या सांठली
का अबोलीची मुग्धता तुला लाभली
कुणि भाग्यवंत नर–घालविल ह्या
रातराणिचा रुसवा

## हिंसा

हिंसा आणि अहिंसा
पाप आणि पुण्य
नुसत्या कल्पनाच आहेत ह्या
हिंसा पाप नाहीं, नव्हे—
हिंसेचीच जगाला आत्यंतिक गरज आहे
हिंसा सामर्थ्याचें प्रतीक आहे—
जीवन जगण्याचे एकमेव साधन आहे
अहिंसा दुर्बलांचे आश्रयस्थान आहे
सामान्य जीव अहिंसेच्या वेष्टनाखालीं
तोंड लपवून जगतो—एवढेंच
वनकेसरी उपाशीपोटीं देखील
गवताला तोंड लावणार नाहीं
समर्थांचा तो धर्म नव्हे
अराजकाला बाजूला सारीत—
हिंसाच जगाला तारून नेते
निरोगी जीवनाचे तें अमृत आहे
ती समर्थांची मक्तेदारी आहे–दुर्बलांची नव्हे
जीव घेण्याची ज्याला ताकद असते
त्यानेंच दुर्बलांचे जीवन सांभाळण्यासाठीं
अहिंसा पाळावयाची असते
दुर्बलांनीं अहिंसेची स्तुतिस्तोत्रें गावयाची नसतात
तो त्यांचा हक्क नाहीं
" जीवो जीवस्य जीवनम् " ह्याचा अर्थ
एका जीवानें दुसऱ्या जीवावर जगणें
हा नसून दुसऱ्या जीवासाठीं जगणें हाच आहे
हिंसेच्या हातांत शस्त्र आहे—
दयेचें आव्हान स्वीकारायाला—
दुर्बलांचे रक्षण–भक्षकांची आहुति घ्यायला
भिक्षा दुबळ्यासाठीं आहे
हिंसा हें अहिंसा पालनाचेंच व्रत आहे
जुलमाची ती निशाणी नाहीं—
अन्यायाविरुद्ध फडकणारें तें निशाण आहे

## क्रांतीची हांक

ऐकुं ये क्रांतीची हांक जिवा
द्यावया जगा आकार नवा

शब्द जुने जरि अर्थ त्या नवा
सूर जुने नव राग रंगवा
काळोखा फोडीत काजवा
हें शक्य होत चिमुकल्या जिवा

सिद्धांत नवे-नवीन सत्यें
नवीं रूपकें नवी प्रमेयें
नव्या दमाचीं नवीन ध्येयें
देतील जगाला नव विभवा

पायदळीं तुडवुनिया कांटा
नव्या जगाला नवीन वाटा
दाखवीन चालून एकटा
धरुनि करीं क्रांतीचा दिवा

वारुळ वारुळ काढीन खणुनी
भुजंग जहरी टाकिन ठेंचुनी
नव रामायण रचिण्या फिरुनी
शोधिन वाल्मिकी त्यांत नवा

व्यंजन घेऊनि स्वरांत मिळविन
अक्षर अक्षर त्यांचें जमविन
नव्या युगाचें गाणें गाईन
उधळीन जगावरी रंग नवा

हिंसेतुनि जन्मली अहिंसा
निशा वाढवित उदरीं दिवसा
क्रांतीच्या पोटीचा वारसा
निवळील जगाची भ्रष्ट हवा

सप्तमुखांचा अश्व रविचा
धरून आक्रमित पथ स्वर्गाचा
लुळया पांगळया सारथ्याचा
दिग्विजय दिपवित विश्वा

# अंधारी वाट

कुशींत घेऊन जललहरींना
अंग दुमडूनी झोंपला किनारा
रोमांच अंगिचे थरारतीं पाने
फिरे रानझाडी भयें गारठली
थिजलें जिवन आसमंती साऱ्या
भ्रमिष्ट होऊन वारा भिरभिरे
निशा माजलेली गर्द झाडीमाजी
काळ्या बुरख्यांत घोरत पडली
रिप् रिप् फुटे सरिता हृदय
काळोख खेळवी अंगावरी दाट
धीर सावरोनी लोटितांच नाव
फाटलीच रेती फाटला किनारा
जखम भळाळे रक्त गोठवित
मिटुनि नयना वासोनिया मुख
उर्मट प्रवाहा नमवित शीर
शहारुन अंग फिरे नाव मागे
मिणमिणलेला दीप जरी हातीं
दाखवित भुतें पायांत गुंतली
तसाच ठेविला नावेमाजी पाय
हांकारीत पुढे गांठण्या ठिकाण
वल्हें मारतांना चिरला प्रवाह
आक्रंदे स्तब्धता आर्त स्वरांतुन
सुकला पाचोळा करी वळवळ
श्वास मंदावला चुळबुळे जीव
दुबळे नयन ओकित अंधार
शोधित निवारा ओळख घेऊन
जळते निखारे जाळीत अंधार
दुरुन पेटती कुणा श्वापदाचे
पेटलेली वात होत गोरीमोरी
भिवुनिया भुतां मधेंच निमाली
थंडीत उन्हाळा स्वेद डंवरला
मिटल्या डोळ्यांनीं प्रभु आळविला

## मधाळ तुझिया डोळ्यांमधुनी

मधाळ तुझिया डोळयामधुनी
मीच मला घेतले पिऊन
लोभसपणें
भिजून झालो ओला चिंब
विरघळलों पुरा
गळाले कांटे
मिसळलों मातीत नकळत
आणि फुटला कोंब नव्यानें
हिरवा-हिरवा त्या मातींतुन
दुप्पट जोमानें वाढूं लागलो
मीच माझ्यातिल नवा
जग सारें थिटें-खुजें
इतर तृणांची पातीं
उगाच लवलवतीं
उसन्या ऐटीत—गरीब बिचारी
तुडवित त्यातें
सळसळणारा नाग निघाला
कात टाकुनी बेफाटपणें
दुखवित नकुल-कुळां
तूंच एकटी हिमगौरी
कोशांत तुझ्या—
गुदमरले रेशमी किडे
घुमूं लागला
माझ्यांतिल
लाख डोळयांचा
मोरपंखी पारवा

## एकच शब्द

एक शब्द द्या—कर्तव्याचा
ज्याची ठिणगी—काढिल फोडुनी
सुप्तगुप्त त्या—ज्वालामुखीला
पाताळातुनी...

एक शब्द द्या—आशिस मजला
अवघे सागर—क्षणांत दाविन
करुनि रिकामे—अगस्तिरूपें
ह्या हातांनीं...

एक शब्द द्या—उत्साहाचा
अणुशक्तीची—दाविन प्रचीति
हलविन साऱ्या—ब्रह्मांडातें
फुंकारानीं...

एक शब्द द्या—मायेचा मज
झेलिन त्यातें—कमलदलावरी
दंवबिंदूपरि—तेज तयांतिल
विश्व न्याहळिल...

एक शब्द द्या—मज सत्याचा
मशाल त्याची—करुनि जळती
घनांधकारी—दाविन पथिका
चुकलेला पथ...

एक शब्द द्या—विश्वासाचा
ह्या देहाचा—करून शिंपला
निज रक्ताचें—चढविन पाणी
पिकविन मोती...

एक शब्द द्या—मज प्रेमाचा
उचलुनि दाविन—गोवर्धनहि
करांगुलिने—लवलीलेने
प्रलयप्रकोपी...

एक शब्द द्या—सौहार्दाचा
भीमबळानें—खंडिन कौरव
सति-साधूनी—वसुधा सारी
होईल पावन...

शब्द नको परी—मला दयेचा
हिमकण ज्याचे—भिंग फोडतिल
तप्त रवीचें—थिजेल जीवन
लाचारीनें...

## बा चंद्रा

सहज अस्त्र फेकुनी
तुज घेतलें कवेंत
ठेविलें दिव्यत्वाच्या कल्पनेस पुराणीं
मूर्तिभंजक नसे हा
पुत्र वसुधेचा
बांधिला मनोरा
बुद्धि घालुनि इरेला
ठाकला उभा घ्याया
वेध विश्वाचा
स्वतःच होऊन नरबळी
मागोवा घ्याया
विश्वकृतीचा
झेपावतो आहे
लक्ष्मण रेषेबाहेर
काळाचें क्षितिजाचें बंधन झुगारुन
अनंतात झोकून देत आहे स्वतःला

कोणी एक विभूति मात्र
हंसते आहे—
मानवाच्या वेड्या धडपडीकडे पाहून
स्वतःच्या हृदयांत घ्यायचा शोध-बोध
बसल्या जागी विश्वभ्रमण
करविणाऱ्या शक्तिकडे पाठ फिरवून
अनंतांत झेपावणाऱ्या
आपल्या वेड्या बांधवाकडे पाहून—
त्याच्या मिटल्या ओंठातून
पाझरतें आहे
कारुण्यानें ओथंबलेलें हास्य—

# दोन पारवे

आळवीत प्रीतिगीत
घुमत पारवा समोर
बावरली मोहरली
प्रणय-वाटिकेंत नार

तारा—मैत्रीत फुलत
जीवन उन्माद ज्योत
विव्हल मद-मुग्ध वेल
घुमत पारवा समोर

याचनेंत मिटुनि जात
नवोन्मेष पुरुषार्थी
अस्थिरसे पदन्यास
टाकुनि घेरी प्रियेस

कंठांतुनि विविध भाव
उमलुनि येतां सुरम्य
फुलवुनिया वक्षःस्थळ
मुजरे दे मानिनीस

प्रीतीच्या प्रांगणांत
आळवीत नादब्रह्म
मायावी अजिजीनें
घुमत पारवा समोर

गिरेंबाजी विलोल
पसरितांच मोहजाल
लाजाळु नयनाचें
भुरळलेंच भोळें मन

भावनेंत भिजलेली
वासना फुले विशाल
तप्त कामिनी करीत
आत्मार्पण सहचरास

जगताची जाणिव
येथें न कुणाला शिवली
दोन जिवांची पडली
एक सांवली नवीन

# सांग-दर्पणा

सांग दर्पणा सांग मला, मी
दिसते सांग कशी
खरेंच का रे दुनिया म्हणते
मी दिसते उर्वशी

नकोस मजला जवळ बोलवुं
सांग मला दुरुनि
जवळीं येतां मला हिणविते
अवखळ कुणि कामिनि
मला ऐकूं दे तुझ्या मुखांतुनि
झालें वेडीपिशी

असो राधिका, कुब्जा काळी
असो रुक्मिणि सती
कृष्णदर्पणीं त्यांच्या प्रतिमा
कृष्णरूप होती
तुला विचारित तुझी गोपिका
येऊन दाराशी

चंद्रकोर वांकून पाहते
प्रतिमा सागरतळीं
तशीच बघते हळुच चोरुनि
चंद्रमुखी मी खुळी
वर्ण केतकी, फिकट वाटते
सुवर्ण बावनकशी

एकान्ती मी तुला दाविल्या
यौवनांतल्या खुणा
शपथ गळ्याची सांगशील जरी
गुपित स्त्रियांचें कुणा
आज यायचे खास पाहुणे
म्हणून नटलें अशी

## निखळलेली ( सिने )तारका

धुंदीने ज्या मार्गावरती जीवन उधळियलें
तोहि मार्ग तिज थकला वाटे...कष्टानें चाले
यौवनासवें रूप पळालें वैभव मावळलें
आशेच्या प्रेतावर पाउल उगाच अडखळलें
उन्मादाच्या वसंतामधें होउनि बेभान
आज अश्रुच्या शाईत भिजवी शेवटचें पान
मद मावळला सुगंध मेला दैन्य उभें दारीं
मृत्यूची पाउलें वळालीं तिचिया माघारीं
मनोरथावरि स्वार होउनी जग जिंकायाची
अपुरी राही आस बिचाऱ्या भ्रष्ट अप्सरेची
अपुरें राही नृत्य निखळतां दुवा पैंजणाचा
अपुरें राही चित्र संपतां रंग जीवनाचा

## तेजोभंग

कल्पनेच्या कुंचल्यांनी
ध्येयचित्रें रंगविलीं
जीवनाच्या संगिताची
रागदारी छेडिली
धुंदिनें डोळ्यांस माझ्या
विश्व अपुरें वाटलें
स्वर्ग अन् पाताळ जिंकाया
मना आज्ञापिलें
टाकितां पाऊल पहिलें
दचकलों मी अंतरीं
कल्पना मेली विरालें—
स्वप्न, फिरतां भूवरीं
सत्य पिचलें सत्व थिजलें
सुजनता तर्यि विव्हळे
रक्त रंकांचें गळोनी
फुलती पापांचे मळे
चारुता भुलली खलातें
कुटिलता फोंफावली
तडकलें मांगल्य अनिति
यौवनें उन्मादलीं
स्वैरता आसूसली अन्
प्रेत शीलाचें पडे
विफलता साम्राज्य अपुलें
गाजवी चोहीकडे

## निर्दय मृत्यूस

वंशवेलीचे फूल कुणाचें
        निर्दयतेने कुस्करुनि
घेऊनि तें निर्माल्य निघाला
        मृत्यु हांसत स्वस्थानीं
त्या हास्याच्या जहरी लहरी
        काढिती हृदया ओरखडे
भळभळ वाहे रक्त त्यांतुनी
        कोमलता शोकांत बुडे
देवाघरच्या फुलास मृत्यो
        दिले न पुरते उमलाया
उलटे काळिज तुझें म्हणुन का
        ठाऊक तुज नाहींच दया
स्वर्ग आणि पाताळ वेशीवर
        ठिकाण पृथ्वीचे वसलें
अनिर्बंध थैमान घालुनि
        स्मशान त्याचें तूं केले
अमर जाहले देव, दानवे
        पाताळीं आश्रय केला
देवदानवा मधला मानव
        दुवा कोंवळा तुज दिसला
जाइल गंजुनि शस्त्र म्हणुन का
        बाळावरती चालविले
मानव रूपें दानव फिरती
        भूवरी, ते न तुला दिसले
बुद्ध–महात्मा–धर्मात्मा कुणि
        उद्धरण्या ह्या जगताला
येईल का जन्मास म्हणोनि
        कंसापरी दावा धरिला
बाळचि तें, त्या अर्थ मृत्युचा
        मुळांतचि कळला नाही
समाधान मग, तेहि कशाचे
        वांट्याला तुझिया राही

## प्रीत रांगते मनांत

ज्योत एकटीच जळे
दूर प्रकाश फिक्कट
माजलेल्या अंधकारा
झाला भिऊन रोगट
जरा उंचावुनि मान
देई धीर किरणांतें
तुझ्या सोनेरी पात्यांनी
टाक अंधारा चिरुन

गान सभोंवतीं गुंजे
स्वर रेंगाळतो दूर
शांततेच्या वलयांनी
बघ घेतला गिळून
जरा उंचावुनि तान
फेंक वलये स्वरांचीं
भेदुनियां स्तब्धतेस
उमटवी निनादून

तुझी तेजाळ नजर
दिव्य शुक्राची चांदणी
चराचर सामावुनी
दूर घोंटाळे क्षितिजीं
जरा उचलूनी टाच
देई अश्व उधळून
क्षितिजाचें मृगजळ
दूर जाईल पळून

प्रीत रांगते मनांत
जीवन हें एकाकिनी
साद मिळेल कोठून
भिंत लाजेची भोंवती
जरा धिटाईची लय
तुझ्या येउं दे प्रीतीला
स्वर-प्रकाशाचे झोत
उभे तुझ्याच पाठीला

# दान

तुझिया दारीं—पाऊल टाकुनि
सर्वस्वाचें दान तुला मी दिलें
माझी—मी न अतां राहिलें

जीवनगाथा माझी अपुरी
घेऊनि आलें तुझिया दारीं
अपूर्णतेला येत फुलोरा
फुललीं प्रीती-फुलें

थरथरताना कोमल काया
तव स्पर्शानें केली किमया
मोहरून ये स्त्रीपण माझें
जड झालीं पाऊलें

धुंद-फुंद हें झालें जीवन
बहरून आलें सारें यौवन
मोरपिसाच्या स्पर्शसुखाचें
अमृत मी सेविलें

# योगिनी

विसरलास आजवरी
विसर यापुढेहि मला
ना टळे कुणास लेख
नियतीने लिहिलेला

आळवून गीत जुने
जागवूं नकोस मना
विझलेला दीप आज
पेटवूं नकोस पुन्हा
राहूं देत जीवनांत
अंधकार भरलेला

गडद रंग पाहुनिया
भृंग दंग जाहला
प्रीत-गंध कलिकेचा
वाऱ्यावरति विरला
हुंगण्यास तोच गंध
व्यर्थ देह झिजविला

वाळल्या स्मृतीस आज
बहर यायचा कुठून
योगिनिचें व्रत धरिलें
जन्म घेतला नवीन
प्रीतीहुन भक्ति थोर
मुक्तिमंत्र घेतला

कालची उरे न कळी
उरले निर्माल्य जुनें
जीवन-सरिता उरली
वाहुं देत संथपणें
एकटी तपोवनात
राहूं देत जानकीला

# पृथ्वी गोल फिरते आहे

असंख्य जीव पाठीवर घेऊन
पृथ्वी गोल फिरते आहे
विझणाऱ्या चंद्रदीपाच्या उजेडांत
ग्रहा-ग्रहांचे मार्ग चुकवीत
स्वतःचा तोल सांवरीत
आदमपासून जन्मलेली ईव्ह
आदमभोंवतीं घुटमळते आहे
एकजीव होण्यासाठीं—
मीलनाच्या दाहकतेंत जळून जाण्यासाठीं
पतंगासारखी—
दिव्यावर झेप घेते आहे
तरीहि पोटची माया
तिला मागें खेचतेच आहे
जीव जिवाच्या हिंसेसाठींच
जगतो आहे
जन्माला घातलेल्या जिवांत
भ्रातृत्वाचा अभाव आहे
कडीकुलुपांतील संपदा जाळीत
पोटापाठीवर ओरखडे काढीत
जन्मदात्रिला रक्तलांच्छित करीत
कृतघ्न मानव त्यांत भर घालतो आहे
तरीही—
जळती उन्हें पाठीवर घेऊन
अंधाराची छाया धरते आहे
वरून शांत दिसते तरी
आंतुन मात्र जळते आहे.
शिक्षा तीहि हात राखुन करते आहे
पण—मायेलाही अंत आहे
अनंतांत सती फिरते आहे
तेजोवलयांत विलीन होण्याची आकांक्षा
दिवसेंदिवस बळावत आहे
पृथ्वी गोल फिरते आहे
स्वतःभोंवती— सूर्याभोंवती

# अहेर

काढुनि नभिंचा चंद्र राजसे
दीप तुझ्या मंदिरांत लाविन
ढगांतला कापूस पिंजुनि
अंथरीन शय्या तुजसाठी

चुरगाळोनी जलमेघांना
स्नान तुला अभ्यंग घालीन
निवटोनी त्यांतील चंचला
कर्णभूषणे तुजला घडवीन

चंद्रकला काढून निशेची
शालू देईन तुज नेसाया
जरिपटका काढून रवीचा
जरतारी तुज शेला देईन

नवग्रहांच्या नवरत्नांचा
हार तुझ्या कंठांत घालीन
मणिमंगळसूत्रांत गुंफण्या
नक्षत्रांची रास रचीन

लाल लाल अरुणाची टिकली
तुझ्या कपाळी दिसेल शोभुन
तुझ्या प्रीतिच्या पुष्पकांतुनी
शक्य मला हे सारें होईल

अधरामृत सेवनेंच तुझिया
अमर होऊं या चल दोघेजण
स्वर्ग दुजा निर्मून आपुला
खुशाल राहूं तेथे आपण

# अमरज्योत

छाया नाचतात भंवती
गिळाया दीपांच्या ज्योती

ज्या दीपांतिल तेल संपले
तेज पुरें ज्यांतिल ओसरलें
जळण्याचा त्या अधिकार नुरे
ह्या जगतावरती

तोंच कुणि कुजबुजलें कानीं
दीप उजळतो तेल जळोनी
मरणाची मग सक्ति कशाला
त्या दीपावरती

तेलही जळतां त्या दीपांतिल
जीवनकार्य तयाचें होइल
जाईल संपुनि निशाच, येईल
पहांट भूवरतीं

अपुरें पडतां तेलहि तोंवर
दीपज्योत नच विझेल सत्वर
ज्या हातांनी तेल ओतिलें
येतिल ते पुढती

# सातत्य

संथ जलांतिल नीलता
        कौमुदी पुनवेंतली
झिरपते डोळ्यातुनी
        स्निग्धता भारावुनी
श्रावणातील आर्द्रता
        कवटाळीते जड चेतना
नवजीवनांतील स्पंदना
        उधळून दे वसुधेवरी
विश्वजननी मानवाची
        सुफला–सुकोमल मेदिनी
पृथ्वी सगर्भा ही दुजी
        तुझिया स्वरूपाने नटे
नव अंकुराच्या खुणा
        मिरवीत उदरी कौतुके
हुंकारतो गर्भात आत्मा
        " संभवामि–संभवामि "
मानवाच्या वारशाचे
        येथ उमटे पाऊल
जाळुनि मदनासही
        भस्म चर्चुनि मस्तकीं
योगिनीसम—दर्शनें
        नतमस्तकें भारावलो
तेज ब्रम्हांडांतले
        शोभतें उदरीं मुखीं
नर कोणता–वा–कोणते
        खंत मज त्याची नसे
जाबाली वा कुंती जरी
        वंद्याच तूं मजला सती

## सैतान

अवसेच्या त्या भयाण रात्री
मृतजीवांची प्रेतें जळती
धडधडत्या सरणांच्या ज्वाला
रूपें बदलुनि क्षणाक्षणाला
चाटुनी जिभल्या वळवळताती
भक्ष्य आपुले गिळावयाला
चितेभोवती कराल छाया
झेपावती प्रेतास गिळाया
शून्यातुनी मृत्यूच हांसला
विकट हास्य, आभास जाहला
घुबड देतसे घुत्कारानें
साथ तेथल्या भयाणतेला
आणि कुठुनसे श्वान विव्हळें
जमवाया भूतांचे मेळे
वेळ जाहली सैतानाची
दिसे साऊली काय तयाची
हात चितेवर तशांत दिसला
उचलित जळत्या अंगाराला
चिलीम तयावर शिलगावोनी
सरणांची शेकोटी करूनि
जाळुनी साऱ्या माणुसकीला
धूम्रपान करण्यांत रंगला
त्या प्रेतांच्या जातीमधला
मूर्तिमंत सैतान भासला

## कर्पूर मी

कर्पूर-वेडा मी
तसंच जगावं आणि
जगतां जगतां अदृश्य व्हावं
जळून नव्हे—हळुहळू
थंड-मंद-गंधानें
आनंदानें–धुंदीनें
आसमंतांत विरून
आणि तूं आलिस
माझ्या नवजीवनाचा गाभारा होऊन
मनस्वी उमेदीनें
आत्यंतिक जिद्दीनें
कालीमातेच्या आवेशानें
आकांक्षांचे नव इमले
माझ्याकरवीं बांधून उभारण्यासाठीं
आपलें सर्वस्व पणाला लाविलेस
माझ्यांतला मी साकारण्यासाठीं
पण—
माझें मन भौतिकतेंत रमतच नाहीं
दुनियेंत राहुनही
दुनियेशीं अलिप्त होऊन
एकदांच जगायचें जीवन
धुंद-फुंद जगावें
असाच माझा पिंड आहे

## प्रीत कुणाची मला मिळाली

प्रीत कुणाची मला मिळाली
जन्माची मज सखी लाभली

ये ये, विपदे लाजुं नको गे
जीवन रंगे तुझिया संगे
नयन भुकेले तव अनुरागें
तूंच एकली प्रेम माऊली

ऋणानुबंधा जुन्या जाणुनि
मातेच्या उदरांत हुडकुनि
जन्माची मम वेळ साधुनि
स्वागतार्थ जी धांवुनि आली

पांचवीस मी तुला पूजिलें
बारसेंच तव ओटित झालें
बालपणीं कर करीं गुंफिले
पदोपदीं धरलीस सांवली

तूंच मला शिकविलें ऐकण्या
गरिबांच्या यातना—कहाण्या
आधीं त्यांचे अश्रु पुसण्या
आणि गावया त्या अंगाई

टांचा घांसुनि पोटासाठीं
नयनाश्रूंचें पाणी पिउनी
निश्चिती करण्यास उद्याची
तळमळताती अगणित आत्मे
रक्ताच्या पाण्यांत भिजविले
अन्नाचे कण लागती बेचव
जित्या जिवांचें अरण्यरूदन
शेणकिड्यासम त्यांचें जीवन
ऐकविलें दाविलेंस डोळा
चेतविला देहाचा स्थंडिल
आणि उठे चैतन्य खवळुनी

बदलाया बुरसटली नीती
हीच तुझ्या प्रीतिची नवाई

चंद्रमौळी घरट्यांत उमटलीं
भगवंताची पद्म पाऊलें
दर्शन त्यांचें तूंच घडविलें
जीवन मुक्ति तूंच अेकली

## पडका वाडा

अन्धुक धूसर बुरखा घेऊनि
        उदासीनता रेंगाळतसे
अस्तित्वाची पुसट पाऊले
        जळमटांत गुंतली अडकली
ठेंचाळत बावरी नजर तों
        जीर्णत्वातुनि स्मृती दचकती
अदृष्टांतुनि नजर चुकवुनि
        अशुभ शब्द निसटती चहूं कडे
अशांततेचे चाळ बांधुनी
        धडपडते हुरहूर अन्तरी
निपचित पडलें शव छायेचें
        खावयास एकान्त वखवखे
विस्कळीत निज देह पसरुनी
        शिस्तीनें आंथरूण धरिलें
काळाच्या राक्षसी मिठीतुन
        अवशेषांची राख पडतसे
मैत्रीच्या वाढत्या फटींतून
        अंग चोरुनि किरणही शिरले
गत काळाचें भूत दावि का
        बोट जगाला भविष्याकडे

## आलें यौवन मम दारीं

आलें यौवन मम दारीं
पाठीमागुनि—चाप घेऊनि
फिरतात शिकारी—आलें यौवन मम दारीं

केतकिच्या ह्या वनांत फिरतां
सळसळती रे भुंजग, बघतां—
नागिण जणुं जहरी—आलें यौवन मम दारीं

अंगांगांतुनि अनंग भरला
अंवती भंवती सुगंध फुलला
धुंद मनोहारी—आलें यौवन मम दारीं

किणकिणती मेखला कटेवरि
पदन्यास ये घुमवित नूपुरीं
वाजवीत बांसरी—आलें यौवन मम दारीं

शीळ ऐकुं ये मज एकान्तीं
धुंडाळित तुज नजर काननीं
राधिकाच बावरी—आलें यौवन मम दारीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २००८६ दि. ५।१०।९१
क्रमांक २९६६ नोंद दि. २३।११
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२००८६
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

## सूड

आसुड झेलाया पोटावर
मला शिकविलें तुम्हीच ना हो
आतां ठेवुन बोट दयेवर
व्यर्थ कशा फोडितसा टाहो

रक्त मला ओकाया शिकवुनि
न्हाऊ घातलें असेच होते
चटक त्याच रक्ताची लागुनि
कणाकणांतुन रक्त उसळते

" भीक मागुनी दया न मिळते "
मंत्र मला होता सांगितला
तोच मंत्र शिकविण्या तुम्हांते
काळपुरुष हा परतुनि आला

हृदयावर ह्या लाथ मारुनि
माणुसकीचा झरा बुझविला
हातानें आतां उकरोनी
जिवंत तो का कुणा लाभला

हांकारुनि सामर्थ्य पाशवी
झुगारून पापाचें बंधन
सूड पुरा घ्यावया दानवी
कालिकेस केले आवाहन

सूड सूड आसूड ओरडे
मूठ वळवळे चवताळोनी
फाड फाड ओढून कोरडे
जखम जिवाची काढिन भरुनि

## डोंगरमाथा

डोंगरमाथ्यावरती
चढतां ये भरून ऊर
मीच मला ओढित तरि
जगतापासून दूर
अचपळ तरि मन माझें
अवखळशा बाळापरि
झुळझुळत्या पवनाच्या
पंखावरि आरुढलें
टाकुन मागेंच मला
झेपावुनि उंच उंच
बघतां बघतां क्षणांत
खोल दऱ्या-खोऱ्यांतुन
दूर निळ्या आकाशीं
गिरिशिखरांच्या राशी
तुडवित जाई खुशाल
लागे हातीं न मुळीं
क्षण येथें क्षण तेथें
क्षण भूवरि क्षण नभांत
दूर निळ्या सागरिंचे
उडवित कधिं जलतुषार
मेघांच्या गर्दीतुनि
लपंडाव कधिं खेळत
हुलकावणि देत फिरे
मानवी नजरेस कधीं
लीलेनें वृक्षांना
प्रेमें कधिं कुरवाळित
कोमलसा पुष्पगंध
उधळित ये वाऱ्यावर
क्षितिजाच्या धारेवर
तोल सांवरीत कधीं
डोकावुनिया पल्याड
वांकुन पाताळ बघे

सायंकिरणी रविचे
सोन्याचे धरुन दोर
स्वर्गाचा घ्यावयास
ठाव, चढे कधिं वरती
भेटति येथेंच तया
देवदेवता कितीक
आत्म्याचें विश्वरूप
दर्शन घडतें इथेंच
सत्य आणि सुंदरता
पावित्र्याचें प्रतीक
प्रभुचे येथेंच दिसे
अमृत तें भरुन घेत
स्वत्वाला विसरुनिया
अव्यक्ता आलिंगित
ब्रह्मानंदांत डुले
होउनिया एकरूप
मानवि क्षुद्रत्व इथें
प्रत्ययास येत घडी
विसरुनिया मोहपाश
ईशपदीं लीन होत

## —आणि हें जीवन

चवथिच्या नवचंद्राची
उगवतां चंद्रकोर ही
बाल्याचा रंग सोनेरी
चंद्रिका न्हाऊ घालिते
मायेच्या रेशमी गांठीं
गुंतला जीव कोंवळा
भूमिच्या अंकावरचा
मातिचा डाग लागला
नाविन्यें भरल्या जगतीं
बुजलें दुबळे मन
आकंठ पिऊनी घेई
सारखे नवजीवन
उन्मादें चढतां चढण
प्रीतीच्या मोहमंदिरी
यौवनाच्या पथा दावी
धोक्याचा तांबडा दिवा
मदाचा सुटतां पीळ
होतसे सत्यदर्शन
यशाच्या गांठण्या शिखरा
कर्तव्या नजर धुंडिते
मागुता वळुनि पाहे
पापांची नाचतीं भुतें
पुढती घोर दिसताहे
पाताळीं उतरता कडा
चुकलेला मार्ग त्या ओढी
विधीच्या न्यायशासनी
मनाचा दाह भडकोनी
देहाचें पान वाळलें
शरणांगतीने उभवी
जरेचा ध्वज पांढरा

मोगाया कृतकर्माते
	मोडकी मान वांकवी
लाटेचें गिळुनी पाणी
	झोंपला शांत सागर
पौर्णिमेच्या पटावरती
	अवसेचा रंग सांडला

## वैनतेयाची पिलें

हें घर—हें घरटें
धारदार पोलादी
इवल्याशा चोंचींनीं
किलबिललें
फोडाया शतवज्रा

हें घर—हें घरटें
सात समुद्रांचीं डबकीं
मेरू मंदार खुजे
फडफडले पंख नवे
अंतरिक्ष भेदाया

हें घर—हें घरटें
अग्निचें बिंब जळे
तेजाचा झोत उडे
नयनींचे नीलमणी
तप्तगोल तो गिळुनी
स्वर्गाचा वेध घेत
हंसत उभें

हें घर—हें घरटें
नाजुकशा सोनेरी
पात्यांची मूठ वळे
चिमुट पृथ्विचा गोळा
लाथेंने धुडकाऊनि
तक्षकास तुडवाया
जीव सानुले जमले

उद्यांच्या सम्राटां—
आज तरी—
भूमीचा घांस हवा
सूर्याचें तेज हवे
वायूचा श्वास हवा
मायेचा हात हवा

अबलांच्या छायेंतचि
शक्तीचा पिंड घडे

## वारांगनेस

सात्विकतेचा डोळा चुकवुन
हळुच तुझ्या दारावर आलों
मोल तुझ्या देहाचें मोजुन
क्षणैक मालक तुझा जहालों

थंडगार गात्रांचा मुडदा
अंगावरि माझिया झोकुनी
चुकता करण्या अपुला सौदा
घेतलेसका डोळे मिटुनी

गाभाऱ्यांतील परि अंतरिची
आग भडकली ओलाव्याविण
भूक भागवुनि या शरिराची
होईल काय मनाचें तर्पण

यौवन अपुलें आणि चातुरी
इरेस लावुन धरिसी सावज
व्यवहाराचें प्रेम तुला जरी
प्रेमाचा व्यवहार हवा मज

मेलें मन, निर्जीव भावना
घेउनि जगतीं मिरवे मानव
माणुसकीचें सुतक न कोणा
पदोपदीं हा येई अनुभव

रीत तुझी आगळी न त्याहुन
मला तरी का हव्या भावना
मानभावि जगता लाथाडुन
असाच येइन तुझ्या दर्शना

## तूं मंगला

जीवनलतिके,
उघड्या डोळ्यांनी
अ-शोक वृक्षासांगाती
नव्वद अंशांचा काटकोन करुनि
माझिया दुःखनिधिस विभाजण्या
पुजारिणीचें वाण
घेऊन करी आलिस धांवुनि
आईच्या हातांनी
घालित विंझणवारा
निरंतर जागता पहारा
धरिला शिरीं
मज काळ्या कातळास परि
तुझ्या रेशमी सावलीचें काय
तमा न त्याची तुला
तपस्विनी तूं
मज उद्धराया
पुण्य घातले इरेला
आणि...येऊन कोणीतरी
कोरील शिलेतून मूर्ती
तूं सुवासिनी
होऊन वेली
राहशिल उभीं दारीं
आपुल्या देवाच्या मंदिरीं
उधळाया फुले
आनंदाश्रूंनी ओथंबलेली
हाच दिलासा धरुनि उरीं
विसावलो चरणी तुझिया
उघड्या माळरानावरी
आशेनें—

# जीवनाच्या उतरणीवर

प्रीतिचा रंग फिकट जाहला
यौवन प्रांतीं— जो दोघांनीं
मुक्त करें— उधळिला
प्रीतिचा रंग फिकट जाहला

कुठें असे तो मादक नखरा
जलें आटलीं— उरे किनारा
कांठावरती जीव तडफडे
जळे जीव एकला
प्रीतिचा रंग फिकट जाहला

आठवते अधरामृत गोडी
कुशीत लपली बोलवेवडी
आज उरे पण— दुपारचे ऊन्ह
अंधारची उरला—
प्रीतिचा रंग फिकट जाहला

उरोज होते थरथरणारे
गुपित मनींचें कुजबुजणारे
पैंजण तुटले— स्वर मावळले
नाद लुप्त जाहला
प्रीतिचा रंग फिकट जाहला

विसरलीस का तव हृदयेश्वर
पटलें का तुज जीवन नश्वर
पाट पुजेचा मांडुनि बसशी
आळवीत प्रभुला—
प्रीतिचा रंग फिकट जाहला

## गाऱ्हाणें

[ राजकवि यशवंतांची क्षमा मागून ]

“ आई ” म्हणोनि कोणी आईस हांक मारी
परि बापुड्या पित्याला कोणीच ना विचारी
का मोल ना तयाला जा आईला विचारा
त्या माय लेंकरांना देई कुणी निवारा
छायेंत रे कुणाच्या ती शोधिते विसांवा
थकल्या तिच्या जिवाला आधार तोचि ठावा
सोडून लाज भीड सोसून देह दंड
मिळवावयास चारा तो कष्टतो अखंड
पाऊस ऊन वारा लागू नये म्हणोन
होऊन वृक्ष रक्षी वेला फुलांस कोण
वात्सल्य हें पित्याचें मी रोज रोज पाही
त्या माऊलीस त्याची जाणीव नित्य होई
स्वामी तिच्या जगाचा त्यावीण ती भिकारी
अवहेलना तयाची तिज होय शोककारी
हा स्वार्थत्याग करूनी त्या भागल्या जिवाला
का गायिलें न कोणी कवनीं अशा पित्याला
स्तन आईचे पिवुन का ओशाळल्या मुखांनीं
ऋण आपुल्या पित्याचें अवमानिलें कवींनीं

# तुला बघून

फडफडली प्रीत उरीं बघुनी तुज शेजारीं
धडधडत्या हृदयाची चाहुल अस्वस्थ करी
ओघानें वळवळत्या नजरेला नजर भिडे
मुसमुसल्या यौवनास जगताचा विसर पडे
प्रीतीचा रंग लाल विना सांगतां कळला
नवतीचा बहर तुझ्या तनुलतिकेवरी फुलला
प्रणयाचे बोल तुझ्या ओंठावर विरघळले
अंतरिचे भाव परी नयनांनीं सांगितले
हृदयाची श्रीमंती पदरा आडून दिसे
राखणदारीण कृष्ण नागिणी त्यावरी विलसे
पाहियलें तुजसि वळुन आणि पाहतांच पुन्हा
सात जन्मिचा सखये आठवला स्नेह जुना

## तूं तर अरुंधती

तूं नसतिस जर सती
कुठें ग वैभव ऐरावती
मदालसेच्या मादकतेची
चाल तुला लाभती
तूं नसतिस जर सती
घरीं का मिणमिणते पणती
प्रकाशती तव नयनामधुनी
समईच्या ज्योती
तूं हसतांना चंद्रमण्यांचे
तुषार पाझरती
शब्दरुपाने तुझ्या मुखातूनि
अमृतकण झिरपती
सत्वपरिक्षा घ्याया येतां
त्रैलोक्याधिपती
होऊन बाळें पतिव्रतेच्या
स्तनपाना झोंबती
लक्ष्मी तारा उमा तुला ग
ओंवाळती आरती
तूं नसतिस जर सती
फिरति ना शुन्यातुन धरती
तूं विश्वाची माय माऊली
दुसरी अरुंधती
तूं तर दुसरी अरुंधती

## हिरवी साल

फुलाफुलांचे पंख लावुनी
रंग प्रीतिचे सर्वे घेउनी
विरल वितळत्या नीलाकाशीं
इंद्रधनूचे रंगहि बदलीन

झुळझुळत्या वाऱ्याची मखमल
पांघरून जाईन तरंगत
चुंबनातलें स्पंदन जगण्या
निःशब्दांचीं जमवुन वलयें

पौर्णिमेंतली पिउन चंद्रिका
पुसट नशेचा रथ अधांतरीं
रेंगाळत जाईन घेउनी
क्षितिजाच्या निसरड्या कडेनें

शब्द कोंवळे निर्लेपाचे
निरागसाच्या बालमुखांतिल
पानांपानांमधलें संगित
हृद्‌कलशांतचि घेइन भरुनी

नृत्याचे झंकार लहरिंच्या
फेंसामधुनी घेइन चोरुनि
हीं स्वप्नांचीं जाळीं विणण्या
जीवन-धागे तुझे मला दे

## विश्वसंगीत

ओंठावरती ओंठ ठेविले
अधरामृत आकंठ सेविले
आदिपुरुष अन् विश्वशक्तिचें
प्रेमसागरीं मीलन झालें
स्वर्ग आणण्या धरेवरी
घालित गवसणि दोन करीं
कुंभ सुधेचे भरलेले
सहजचि मग हातीं आले
उणा अधिक संयोग घडे
विश्वाचें सुटलें कोडें
सौंदर्याचा आणि पुढे
शक्तीला अभिषेक घडे
निघे न्हाउनि वसुंधरा
पराक्रमाच्या तेजानें
लेवुनि हिरवा (सौ)भाग्य चुडा
अरुणाचा बाळंतविडा
मिरवे सृष्टी थाटानें
बीज धारणेचें लेणें
प्रसववेदनेच्या काळीं
चराचरा भरती आली
प्रलयकाळ उचली मान
वीज घालीते थैमान
वरुण घालि तिज स्नानजलां
वायु हालवित हिंदोळा
अनंतांत राहून उभा
ओति चंद्रमा शीतप्रभा
शाल पांघरुनि शिशिराची
बैसे वसुधा नवतीची
उत्कंठेचा काळ सरे
आणि जाहलें स्वप्न पुरे
मायेच्या अंकावरची
दिसे खूण मग प्रेमाची
" वसंत " खेळे विश्वांत
हेंच गीत कोकिळ गात

## पूर्ती

पारदर्शक अंबरीं जीव बुडे नग्नतेंत
अवगाहनें शरीर वेडावतें मीलनास
गुंजे मोहोळाभोंवतीं लख पाकळ्यांचें मन
छिद्रांछिद्रांतून मध देवतेपायीं ओताया
वडवानळ शरीरीं निवेल तो तेजोगोल
अभिषेक–पूर्ण रूप धरीन मी मस्तकींच
विसावण्या प्रशांतची जटेतील पूर्णचंद्र
तेणें घडेल पूजन अर्धनारी-नटेश्वरा
तांडवनृत्यें दुभंगो पायाखालची जमीन
विसांवतां झंझावात मार्ग आक्रमूं नवीन
संथ वाहेल निर्झर ओढ जाईल दमून
तेल सारे पिऊनिया विझूं देत फुलवात

## अनंतातुन... अनंताकडे...

अशी अचानक
मलाच नकळत
जाग ही आली
मानवतेच्या मेळाव्यामधिं
हात कुणितरी हातीं घरुनि
सांवरीत चालविलें जपुनी
संवेदन—अन् वेदनेंतुनि
आजुबाजुला बघूं लागलो
थवे जिवांचे—सर्वे माझिया
त्याच पथावर
कुठेंतरी—
दूरदूरवरी नजर रोखूनी—
उभे आडवे—
सरकत होते
कुणा न कळलें—कशास आलों
कुठें जायचें—कधीं जायचें
हलुच कुणि मग मधेंच बसले
कुणी मधें—अदृश्य जाहले
एक दुजाला धीर देत कुणी
तसेच सरकत पुढें चालले
माझे हातही मधेंच सुटले
आधारचि ते—तसेच गेले
कुणास ठाऊक—कुठें ? कशाला ?
क्षणिक मनाला वैराग्यानें
तिथें घेरिलें—आणि थांबलों
घडीभर तेथें—भरल्या नयनें
नव्हतें माझ्या हातीं कांहीं
बघतां बघतां स्वप्न निमालें
पाय उचलले—पुढें चाललो
कुठें ? कशाला ? अजुनि न कळले
मधें मिळाला हात नव्यानें
नाजुकसा—मायेनें भरला

वारा घालित—गोंजारित अन्
देहाची छाया पसरित वर
सवें चालला धीर शिंपडित
क्षणभर दिसलें माझ्या नयनां
इतर बापुडे जीव जिवाणूं
मीच एकटा वीर शिकंदर
भोळा जीव !
चुकोनि आला होता जवळीं
गणित स्वतःचें सोडविण्यास्तव
उत्तर माझ्यापाशि मागण्या
अगदीं भोळा—अगदीं भोळा—
कुठें किनारा—दिशा कोठली
पांथस्याला अंत न लागे
आणि लागला देह झिजाया
मन आंकसलें आणिक मेलें
पाय निघाले—मात्र एकटे
कुठे भावना अन् संवेदन
नजर गळाली—भोंवळ येते
माझे मजला कुणि न दिसतें
भास होतसे—
या पूर्वीही
असाच होतो चालत रखडत
आजही आहे तसाच चालत
कोण पाहते अदृष्टांतुनि ?
काय मागतें माझ्यापाशीं ?
उजेडांतुनि—अंधारांतुनि
चालत राहिन असाच रखडत
आणिक जाईन एके दिवशीं
एकटाच जगतांत मिटोनी
पुन्हा कुठेंतरी जन्म घ्यावया
तेंच तेंच जीवन जगण्यास्तव
अर्थशून्यचि—ध्येयशून्यचि
कोण खेळतें खेळ असा हा
सौख्य तयाला त्यांत असे का
घेऊं देत तर ज्याचा त्याला
हेका पुरवून

वारा घालित—गोंजारित अन्
देहाची छाया पसरित वर
सवें चालला धीर शिंपडित
क्षणभर दिसलें माझ्या नयनां
इतर बापुडे जीव जिवाणूं
मीच एकटा वीर शिकंदर
भोळा जीव !
चुकोनि आला होता जवळीं
गणित स्वतःचें सोडविण्यास्तव
उत्तर माझ्यापाशि मागण्या
अगदीं भोळा—अगदीं भोळा—
कुठें किनारा—दिशा कोठली
पांथस्थाला अंत न लागे
आणि लागला देह झिजाया
मन आंकसलें आणिक मेलें
पाय निघाले—मात्र एकटे
कुठे भावना अन् संवेदन
नजर गळाली—भोंवळ येते
माझे मजला कुणि न दिसतें
भास होतसे—
या पूर्वीही
असाच होतो चालत रखडत
आजही आहे तसाच चालत
कोण पाहते अदृष्टांतुनि ?
काय मागतें माझ्यापाशीं ?
उजेडांतुनि—अंधारांतुनि
चालत राहिन असाच रखडत
आणिक जाईन एके दिवशीं
एकटाच जगतांत मिटोनी
पुन्हा कुठेंतरी जन्म घ्यावया
तेंच तेंच जीवन जगण्यास्तव
अर्थशून्यचि—ध्येयशून्यचि
कोण खेळतें खेळ असा हा
सौख्य तयाला त्यांत असे का
घेऊं देत तर ज्याचा त्याला
हेका पुरवून

## चेतशून्य

नव्हती राधा नव्हता माधव
नव्हते कौरव नव्हते पांडव
व्यास मुनींचीं मानस बाळें
होतीं नटली रूप आगळें
विश्व जन्मलें अणु बिन्दूतुन
चैतन्यानें भरलें जीवन
बिंदूमधुनि रेघ जन्मली
वलयांकित लय भरुनी उरली
अक्षरांतुनि गुरफटलेली
वेदरूप होऊन राहिली
गुंफियलें रामायण भारत
तेंच आपुलें ठरलें दैवत
देव देवता स्वप्न मनोहर
दगड मातिचें चंद्रकलेवर
अणुरेणु चैतन्य लोपतां
जीवनास येईल शून्यता

## अखेरचें मागणें

लावुनी सूर भैरवीचा
संपवा रंग मैफलीचा

मृत्यूची मज चाहुल लागे
करा तयारी माझी वेगें
प्रवासास मी जाया मागे
मागतों, निरोप शेवटचा

आमंत्रण देवाचें आले
देवदूत खोळंबुनि बसले
कार्य तयांचें अडुन राहिलें
दाविण्या मार्ग मला पुढचा

चुकुनी हात कुणाला दिधला
पाय मात्र इतरांस लागला
हेंच शल्य लागलें जिवाला
पसरितों पदर याचनेचा

शोकानें आकांत मांडुनि
नका जिवाला लावुं ओढणी
मिळेल ना तर पिशाच्चयोनी
विसरतां—पथ देवाघरचा

REFBK-0020086
REFBK-0020086
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 200८६ दि: ९/१०/९
क्रमांक २९८६ नोंद दि: २३/११
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 200८६
संद. शाखा (स्थळ प्रत)

‘ श्रीलेखा ’ चे कवी श्री. राम सरमळकर हे तसे पाहिले तर एक व्यवहारदक्ष, कर्तबगार अधिकारी आणि गृहस्थधर्माचे मनोभावे पालन करणारे एक नम्र, सौजन्यशील व्यक्तिमत्व. वरवर पाहता सर्वसामान्यां-सारख्या वाटणाऱ्या त्यांच्या आयुष्यात कवितेचा एक जिवंत, चैतन्यपूर्ण झरा झुळझुळतो आहे हे प्रथमदर्शनी कुणाला खरेही वाटणार नाही. परंतु या झऱ्याला आणि त्याच्या निर्मितीला उजेडात आणण्याचे महत्कार्य श्री. सरमळकर यांच्या काही सुहृदांनी केले आणि त्यातून निष्पन्न होत आहे ती ही ‘ श्रीलेखा ’.

या संग्रहातील बहुतेक कविता या कवीच्या अंतःकरणातील चैतन्य-स्रोताचे उत्स्फूर्त प्रकटीकरण आहेत. त्यांत केशवसुतांचा आवेश जसा आहे तशीच बालकवींची भावरम्य नादमधुरताही आहे; तांब्यांची गेयता आहे तशीच गोविंदाग्रजांची उत्तुंग भरारीही आहे. पूर्वसूरींच्या संस्कारांनी समृद्ध झालेली, सखोल आत्मपरीक्षणातून आणि अंतर्मुखतेतून सिद्ध झालेली अशी ही कविता आहे. स्वतःचा शोध–बोध घेत लयबद्ध होण्यात या कवितेचा उगम आहे हे लक्षात घेतल्यास ‘ श्रीलेखा ’ चा आस्वाद घेताना वाचकाला एक आगळे काव्य वाचल्याचा प्रत्यय आल्यावाचून राहणार नाही.

**किंमत पाच रुपये**